CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. १६ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २२६ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## गुजरातचा हैद्राबादवर ३४ धावांनी विजय; सेमिफायनलमध्ये केला थाटात प्रवेश

**अहमदाबाद :** दिल्लीनंतर आता हैदराबादचेही स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आलेय. हैदराबादच्या संघाला १२ सामन्यात आठ पराभवाचा सामना करावा लागलाय. आज नरेंद्र मोदी स्टेडिअमवर झालेल्या सामन्यात गुजरातने हैदराबादचा पराभव केला. या विजयासह गुजरात संघाने आयपीएलच्या सेमिफायनलमध्ये थाटात प्रवेश केला आहे. तर दुसरीकडे या पराभवासह हैदराबादचे यंदाच्या आयपीएलमधील आव्हान संपुष्टात आलेय. एडन मार्करमच्या नेतृत्वातील हैदराबाद संघाने यंदाच्या हंगामात निराशाजनक कामगिरी केली आहे. हैदराबादला फक्त चार सामन्यात विजय मिळवता आलाय. उर्वरित दोन्ही सामन्यात विजय मिळवत स्पर्धेचा शेवट गोड करण्याचा हैदराबादचा प्रयत्न असेल.

**आयपीएल सामना क्र.६३**

LUCKNOW SUPER GIANTS Vs MUMBAI INDIANS

लखनऊ विरुद्ध मुंबई

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : लखनऊ

# शिक्षक पत्नीचा खून करणाऱ्या गुरुजी पतीला जन्मठेपेची शिक्षा

## सहा वर्षीय मुलाला १० लाख देण्याचे आदेश

## जुळे सोलापुरात घडली होती घटना

सुराज्य/सोलापूर

**बांधकाम व्यवसाय, शेअर गुंतवणूक आणि भिशी चालविण्याचा व्यवसायातून कर्जबाजारी झाल्यानंतर आपल्या शिक्षक पत्नीचा तीक्ष्ण शस्त्राने खून करून स्वत: आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या विकास विश्वनाथ हरवाळकर (वय ३६ रा. नीता रेसिडेन्सी, जुळे सोलापूर) या शिक्षकाला जन्मठेप आणि १० हजार रुपये दंड अशी शिक्षा प्रमुख जिल्हा न्यायाधीश शब्बीर अहमद औटी यांनी सोमवारी ठोठावली. तर आई-वडिलांपासून पोरका झालेल्या त्याच्या ६ वर्षीय मुलाला १० लाख रुपये नुकसान भरपाई आरोपीला देण्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.**



या खटल्याची पार्श्वभूमी अशी, आरोपी विकास विश्वनाथ हरवाळकर आणि त्याची पत्नी अर्चना हरवाळकर हे दोघे जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करीत होते. ज्यादा पैसा मिळवण्याच्या आशेने त्याने बांधकाम व्यवसाय, शेअर गुंतवणूक आणि भिशी चालविण्याचा व्यवसाय केला. त्यातून तो कर्जबाजारी झाला होता. घटनेच्या दिवशी म्हणजेच १४ डिसेंबर २०२० रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास त्याच्या मामाचा मुलगा प्रणय यशवंत कांबळे, रा. आदित्य नगर, यांच्या व्हॉट्सअप मध्ये फाशीची दोरीचे चित्र दाखवून त्याच्या बाजूस सॉरी आपल्या विश्वासाला पात्र ठरलो नाही. तसेच इंग्रजीमध्ये 'एवरीथिंग इज लॉस्ट' असे स्टेटस पाठवले होते. स्टेटस पाहिल्यानंतर कांबळे यांनी आरोपीला फोन केला होता. फोन उचलत नसल्याचे पाहून कांबळे हे त्यांचा लहान भाऊ प्रतीक याला घेऊन आरोपीच्या घरी रात्री गेले. आतून बंद असलेला दरवाजा उघडत नसल्याचे पाहून त्यांनी दरवाजाची जाळी उचकटून घरात प्रवेश केला. तेव्हा आरोपी हरवाळकर हा त्यांच्या समोर आला. त्यावेळी हरवाळकर याच्या कपड्यावर रक्ताचे डाग होते. तर त्याची पत्नी अर्चना हरवाळकर ही रक्ताच्या थारोळ्यात पडली आणि मृत अवस्थेत आढळली. तर त्यांचा सहा वर्षाचा मुलगा घरातच बाजूला भेदरलेल्या अवस्थेत बसलेला आढळून आला होता.

या घटनेची फिर्याद प्रणय यशवंत कांबळे (रा. आदित्य नगर) यांनी विजापूर नाका पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी आरोपी विकास हरवाळकर याच्याविरुद्ध खून आणि आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करून अटक केली. तत्कालीन सहाय्यक निरीक्षक शीतल कोल्हाळ यांनी या प्रकरणाच्या तपास करून आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. या खटल्यात सरकार तर्फे एकूण १७ साक्षीदार तपासण्यात आले.

या खटल्यातील नेत्र साक्षीदार आरोपीचा लहान मुलगा आणि आरोपीची बहीण न्यायालयाच्या साक्षीत उलटले होते. मात्र सरकार पक्षाच्या उलट तपासणीत आरोपीने आपल्या पत्नीचा निघृणपणे खून करून स्वत: आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे सिद्ध झाले. त्याप्रमाणे न्यायालयाने आरोपीला जन्मठेप आणि त्याच्या लहान मुलास १० लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले.

या खटल्यात सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत तर आरोपीच्या वतीने ॲड. पुजारी यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून महिला पोलीस घाडगे यांनी सहकार्य केले.

### जीव वाचला पण न्यायालयाने सोडले नाही



हरवाळकर कुटुंब जुळे सोलापूर रेल्वे रुळाजवळील एका अपार्टमेंटमध्ये चौथ्या मजल्यावर रहात होते. विकास हरवाळकर यास झटपट पैसे कमवून श्रीमंत होण्याची अभिलाषा होता. यासाठी तो शिक्षकीपेशा सांभाळत पैशासाठी ना ना उद्योग करीत होता. बांधकाम व्यवसाय आणि शेअर मार्केटमध्ये त्यांनी लाखो रुपये गुंतवले, पण त्याला म्हणावा तसा परतावा मिळत नव्हता. त्यातच तो कर्जाच्या खाईत लोटला. पैशांसाठी त्यांच्याकडे अनेकांचा तगादा सुरु झाला. आणि त्यामुळे अखेर वैतागून त्यांनी प्रथम पत्नीला दगडी वरवंटा डोक्यात घालून मारले. त्यानंतर त्यांनी दारुच्या बाटली विष टाकून पिले. नंतर त्यांने पंख्याला दोरी बांधून स्वत: आत्महत्येची तयार सुरु केली होती. दरम्यान प्रणय कांबळे तेथे आले. त्यांनी दरवाजा तोडून आता प्रवेश केला आणि त्याचा जीवन वाचला. पण न्यायालयाच्या कचाट्यातून तो सुटला नाही.

## गुरुवारी जिल्हा परिषदेतील पदोन्नती प्रक्रिया

सुराज्य/सोलापूर



जिल्हा परिषदेच्या वतीने विस्तार अधिकारी व मुख्याध्यापक पदासाठी पदोन्नती प्रक्रिया गुरुवार १८ मे रोजी राबवली जाणार आहे. यामध्ये ६ विस्तार अधिकारी व १४१ शिक्षकांना मुख्याध्यापक पदी बढती दिली जाणार आहे.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून शिक्षकांना पदोन्नती देण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये सहा विस्तार अधिकारी , सध्या रिक्त असलेल्या व येणाऱ्या ३१ तारखेपर्यंत जिल्ह्यात रिक्त होणाऱ्या मुख्याध्यापक पदाचा एकूण १४१ जागा व केंद्रप्रमुखाच्या १९९ रिक्त जागेचा समावेश आहे. केंद्रप्रमुखाच्या बढती प्रक्रियेला मात्र तूर्तास स्थगिती देण्यात आली आहे. गुरुवार १५ मे रोजी विस्ताराधिकारी व मुख्याध्यापक पदाच्या पदोन्नती प्रक्रियेसाठी समुपदेशन घेतले जाणार आहे. केंद्रप्रमुखाच्या भरतीबाबत मात्र काही तांत्रिक समस्या असल्यामुळे वरिष्ठ कार्यालयाकडून मार्गदर्शन मागवण्यात येत असल्याचे शिक्षण विभागाने सांगितले.

## कालीचरण महाराजावर गुन्हा दाखल

**मुंबई :** नेहमी आपल्या वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत राहणाऱ्या कालीचरण महाराज यांच्यावर आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी स्वत: फिर्यादी होऊन हा गुन्हा दाखल केला आहे.



सिल्लोड तालुक्यातील मोढा बुद्रूक येथे आयोजित करण्यात आलेल्या हिंदू जनजागरण सभेत बोलताना कालीचरण महाराज यांनी दोन समाजात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य केल्याचा ठपका पोलिसांनी त्यांच्यावर ठेवला आहे.

त्यामुळे कालीचरण महाराज यांच्यासह सिल्लोड येथील भाजपचे शहराध्यक्ष आणि इतर चार लोकांविरुद्ध विविध कलमानव्ये सिल्लोड ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुख्यमंत्र्यांचा मोठा निर्णय; श्री विठुरायाला भेटण्याचा वारकऱ्यांचा मार्ग सुकर

सुराज्य/सोलापूर



आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरयात्रेकरिता वारकऱ्यांसाठी राज्यभरातून ५ हजार विशेष गाड्या सोडण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दिले. दि. २५ जून ते ०५ जुलै या दरम्यान या विशेष गाड्या धावणार असून वाखरी येथील माऊलींच्या रिंगण सोहळ्यासाठी (२७ जून रोजी) २०० अतिरिक्त बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

पंढरपूर आषाढी यात्रेसाठी एसटीने बस सेवेसाठी केलेल्या नियोजनाचा आढावा मुख्यमंत्री शिंदे यांनी सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत घेतला. यावेळी राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांच्यासह महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

पंढरपूर आषाढी यात्रा हा महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचा जिव्हाळ्याचा विषय आहे. यामध्ये एसटीच्या प्रवाशी वाहतुकीला अनन्य साधारण महत्त्व आहे. या काळात एसटीकडून आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा प्रवाशांना वारकऱ्यांना दिल्या जाव्यात. भाविक-प्रवाशांना त्यांच्या गावापासून थेट पंढरपूरपर्यंत घेऊन जाणे तसेच विठ्ठलाचे दर्शन घेतल्यानंतर सुखरूपपणे घरी आणून सोडण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी एसटीवर असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. यंदाची आषाढी वारी ही वारकऱ्यांसाठी आनंदाची ठरणार आहे. कारण, मुख्यमंत्र्यांनी वारीसंदर्भात खास नियोजन केलं असून यामुळे आता वारीच्या दिवशी पंढरपूर गाठणं सोपं होणार आहे. यासाठी एसटी महामंडळाकडून खास नियोजनही करण्यात आलं आहे.

**सहा जिल्ह्यांतून गाड्यांचे नियोजन :** आषाढी यात्रेसाठी मुंबईसह, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या सहा जिल्ह्यांतून गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रेसाठी सुमारे ५००० गाड्या सोडण्याचे नियोजन एसटी तर्फे करण्यात आले आहे. औरंगाबाद प्रदेशातून १२००, मुंबई ५००, नागपूर १००, पुणे १२००, नाशिक १००० तर अमरावती येथून ७०० अशाप्रकारे यात्रेसाठी विशेष गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे.

**बसस्थानके उभारणार.... :** पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून बसेस सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी यात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक अशा विविध सोयी-सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

## जीएसटी अनुदानावरच होतोय महापालिका कर्मचाऱ्यांचा पगार

**अनेक विभागात उत्पन्नापेक्षा भरमसाठ खर्च**

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन, पेन्शन, परिवहन कर्मचाऱ्यांचे वेतन, पेन्शनपोटी दरमहा सुमारे २५ कोटींपेक्षा जास्त खर्च होतो. महापालिकेकडून दरवर्षी अपेक्षित अशी करवसुली होत नाही. त्यामुळे शासनाकडून जीएसटीपोटी मिळणाऱ्या २४ कोटी ९० लाखांच्या अनुदानातून हा पगार भागविला जात असल्याचे चित्र आहे.

जकात बंद झाली आणि त्यानंतर एलबीटी सुरू झाला. त्यानंतर एलबीटी बंद होऊन जीएसटी सुरू झाला. त्यामुळे शासनाकडून त्या- त्या महापालिकेला जीएसटी अनुदान दिले जाते. सोलापूर महापालिकेला दरमहा २४ कोटी ९० लाखांचे शासनाकडून अनुदान मिळते. त्यामुळे कर्मचाऱ्यांचा पगार व्यवस्थित सुरू आहे.

पगार सुरू असल्यामुळे वसुलीकडे किंवा इतर विकास कामांकडे अधिकारी लक्ष देत नसल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे सोलापूर



महापालिकेची आर्थिक घडी विस्कटल्याचे चित्र आहे. ड्रेनेज जोडणी झाली, मात्र वारंवार पाणी तुंबलेलेच असते. पथदिव्यांची सोय केली, परंतु बहुतांशवेळा तांत्रिक बिघाड होतोच.

नियमित पुरेसे पाणीच मिळत नाही, अशा विविध कारणांमुळे शहरातील नागरिक कर भरण्यास अनुत्सुक असल्याचा अनुभव अधिकाऱ्यांना येत आहे. पाणीपट्टी, घरपट्टीसह अन्य करांपोटी महापालिकेला दरमहा सुमारे ३६ कोटींचा कर मिळणे अपेक्षित आहे. मात्र तेवढी वसुली होताना दिसत नाही.

महापालिकेच्या टॅक्स विभागाकडून दर महिन्याला सुमारे १० ते १२ कोटी रुपये वसूल होतात. भूमी मालमत्ता विभागाकडून गाळ्यांच्या भाड्यापोटी १५ ते १६ लाख रुपये तर बांधकाम विभागाला विकास शुल्कपोटी किंवा बांधकाम परवाना देण्यापोटी ३० लाखांच्या आसपास रक्कम मिळते. तेवढीच रक्कम नगर विकास नगर रचना विभागाकडे जमा होते.

हुतात्मा स्मृती मंदिर, उद्यान विभाग, प्राणी संग्रहालय, अतिक्रमण विभाग याकडे अधिकारी लक्ष देत नसल्यामुळे या विभागात उत्पन्नापेक्षा भरमसाठ खर्च जास्त आहे.

### उत्पन्न वाढीसाठी विशेष प्रयत्न नाही

गेल्या १४ महिन्यांपासून सोलापूर महापालिकेवर प्रशासक आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांनी देखील उत्पन्न वाढीसाठी कोणतेही विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. महापालिका कर्मचाऱ्यांच्या पगारापोटी २६ कोटींपर्यंत खर्च येतो. मात्र दरमहा तेवढी वसुली होत नसल्याने दरमहा शासनाकडून मिळणाऱ्या जीएसटी अनुदानावरच हा पगार काढला जात आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पाण्याशिवाय जीव नंतर जाईल,
आधी शॉकमुळे चाललंय !!!

| कल्याण |
| --- |
| -------- |

| मेन बाजार |
| --- |
| -------- |

# मुख्यमंत्री निवडीचा 'चेंडू' दिल्लीश्वरांच्या दालनात

## ▪ बंगळुरूत पेच सुटला नाही, निरीक्षकांचे पथक राजधानीत

सुराज्य/बंगळुरु

कर्नाटकमधील मुख्यमंत्रीपदासाठी माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या व प्रदेश अध्यक्ष तथा धनवान नेते डी.के. शिवकुमार यांच्यात जबरदस्त रस्सीखेच सुरू असून रविवारी दिवसभर निरीक्षकांपुढे आमदारांनी आपली कैफियत मांडली. त्यात सिद्धरामय्या व शिवकुमार यांनी या पदासाठी प्रचंड ताकत लावल्याचे दिसून आले. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी नेमलेल्या निरीक्षकांपुढे मोठा पेच पडला. सोमवारी देखील त्यावर निर्णय होवू शकला नाही. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी निरीक्षकांसह सिद्धरामय्या व शिवकुमार यांना दिल्लीला पाचारण केल्याने मुख्यमंत्रीपदाचा चेंडू '१० जनपथ'कडे गेला आहे.

काँग्रेसने निर्विवाद बहुमत मिळविल्यानंतर आता सत्तास्थापनेसाठी गेल्या दोन दिवसांपासून हालचालींना वेग आला आहे. काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यासह तिघांची निरीक्षक म्हणून रविवारी नियुक्ती केली. बंगळूरुमध्ये झालेल्या काँग्रेस



विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत निरीक्षकांनी आमदारांच्या भावना जाणून घेतल्या. त्याआधारे मुख्यमंत्री कोण होणार, याचा निर्णय पक्षश्रेष्ठी घेतील, असे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी स्पष्ट केले. सिद्दरामय्या आणि शिवकुमार या दोघांनीही निष्ठावंत आमदारांसोबत बैठका घेऊन आपली तटबंदी अधिक भक्कम करण्यास सुरुवात केली आहे. रविवारच्या बैठकीत ६० टक्के आमदारांनी सिद्धरामय्या यांना तर ४० टक्के आमदारांनी शिवकुमार यांना पसंती दिल्याचे सांगण्यात येते. दोन दिवसात हा पेच सुटू न शकल्याने श्रेष्ठींच्या सूचनेनुसार शिंदे यांच्यासह त्यांचे सहकारी सोमवारी तातडीने दिल्लीला रवाना झाल्याचे सांगण्यात आले.

### शिवकुमार यांचे सूचक भाष्य

निवडणुकीत आपण सर्वांना सोबत घेतले आणि स्वत:साठी कधीही काहीच मागितले नाही, असे प्रदेशाध्यक्ष शिवकुमार यांनी म्हटले आहे. कर्नाटकमधील तुमकुरु येथे आले असता 'ज्यांना लोकांची पसंती आहे त्यांना की ज्यांनी निवडणुकीत परिश्रम घेतले अशांना प्राधान्य द्यायला हवे,' असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर '२०१९ साली काँग्रेसचा पोटनिवडणुकांमध्ये पराभव झाल्यानंतर सिद्धरामय्यांच्या राजीनाम्यानंतर पक्षाने माझ्यावर प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली. खोट्या प्रकरणात मला तुरुंगात पाठविले असताना सोनिया गांधी आपल्या पाठीशी उभ्या राहिल्या', असे उत्तर त्यांनी दिले.

### समर्थकांचे 'फलकयुद्ध'

पक्षात मुख्यमंत्री निवडीसाठी खलबते सुरू असतानाच सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्या समर्थकांमध्ये फलकयुद्ध रंगल्याचे बघायला मिळाले. राजधानी बंगळूरुसह अन्य शहरांमध्ये दोघांनाही मुख्यमंत्रीपदाच्या शुभेच्छा देणारे फलक झळकले आहेत. शिवकुमार यांच्या घराबाहेर लागलेल्या पोस्टरमध्ये 'नवे मुख्यमंत्री शिवकुमार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा' असा मजकूर आहे. तर सिद्धरामय्या यांच्या घरासमोरही 'भावी मुख्यमंत्री' असा उल्लेख असलेले पोस्टर लावण्यात आले आहे.

CMYK

# उप'योगी' नेतृत्व

कर्नाटकात शनिवारी विधानसभा निवडणुकीचे कौल येऊ लागलाच ज्याप्रमाणे काँग्रेस पक्षात विजयाचा धमाका सुरू झाला,त्याप्रमाणे यूपींत लोकल बॉडीच्या निवडणुकीत घवघवीत यश प्राप्त केल्याबद्दल भाजपाचा तर तिकडे पंजाबमध्ये जालंधर लोकसभेची पोटनिवडणूक जिंकल्यानंतर आम आदमीच्या कार्यकर्त्यांचा जल्लोषाचा धूमधडाका सुरू होता. उत्तर प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत राज्यातील सत्तारूढ भाजपने मोठे यश मिळविल्याचे स्पष्ट झाले. २०17 च्या तुलनेत या वेळी भाजपने नगरपालिकांच्या निवडणुकीत दुपटीने जास्त जागा मिळविल्या. उत्तर प्रदेशातील नगरपालिका निवडणुकांत भाजपने महापौरपदाच्या सर्व १७ जागा जिंकल्या. त्याचबरोबर नगरपंचायत निवडणुकांत भाजपने स्पष्ट आघाडी (५४४ जागा) घेतली. नगरपालिका परिषद निवडणुकांतही (१९९ जागा) भाजपने विजय कोरला. महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपच्या १७ पैकी तीन जणांची सलग दुसऱ्यांदा निवड झाली. कर्नाटक विधानसभा निवडणुकीचे निकाल ज्या दिवशी लागले, त्याच दिवशी उत्तर प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे चित्र स्पष्ट झाले. भाजपने यामध्ये दणदणीत विजय मिळवला. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे स्थान या यशाने भक्कम झाले आहे. उत्तर प्रदेशसारख्या देशातील मोठ्या राज्यात पंचायतींपासून ते दिल्लीपर्यंत आता भाजपची सत्ता आहे. त्यामुळे योगींचे नेतृत्व उपयोगी असल्याचे पुन्हा सिद्ध झाले. आम आदमी पक्षाने केलेली कामगिरी औत्सुक्याचा विषय ठरला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय पक्षांसाठी ही निवडणूक एक चाचणी परीक्षाच होती. मात्र राज्यातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या समाजवादी पक्षाने भाजपला निम्म्या जागांवर थेट लढत दिली. महापौरपदाच्या निवडणुकीत चार ठिकाणी बहुजन समाज पक्ष दुसऱ्या स्थानावर राहिला. काँग्रेसची कामगिरी आणखी निराशाजनक झाली. उत्तर प्रदेशात महापौर थेट जनतेतून निवडला जातो. या निवडणूक झालेल्या सर्व १७ ठिकाणी भाजपचेच महापौर निवडून



आले. प्रदेशात लोकसभेच्या ८० जागा आहेत. त्या दृष्टीने या राज्याचे महत्त्व अधोरेखित होते. मेरठमध्ये असदुद्दीन ओवेसी यांच्या पक्षाने घेतलेली मते समाजवादी पक्षासाठी चिंतेची बाब आहे. महापौर निवडीत राजधानी लखनौसह, वाराणसी, अयोध्या, गोरखपूर, प्रयागराज येथे समाजवादी पक्ष दुसऱ्या स्थानी राहिला. मेरठ तसेच अलिगढमध्ये यापूर्वी बहुजन समाज पक्षाचा महापौर होता. यंदा त्यांची कामगिरी निराशाजनक झाली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा मतदारसंघ असलेल्या गोरखपूरमध्ये समाजवादी पक्ष वगळता इतरांची महापौरपदाच्या लढतीत अनामत रक्कम जप्त झाली. येथे भाजपने सलग चौथ्यांदा विजयी मिळवला. मेरठच्या महापौरपद निवडीत एमआयएम दुसऱ्या स्थानी राहिले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी १३ दिवसांत ५० सभा घेतल्या. पसमंदा मुस्लिमांना आकर्षित करण्याचे भाजपचे प्रयत्न सुरू आहेत. त्याला काही प्रमाणात यश आले आहे. भाजपने ३९५ मुस्लीम उमेदवार दिले होते. त्यापैकी मुस्लीम बहुल भागात भाजपचे पाच मुस्लीम उमेदवार नगरपंचायतींचे अध्यक्ष झाले आहेत. नगराध्यक्षपदाच्या निवडीत १९९ पैकी भाजपला ८७, समाजवादी पक्षाला ३५, बहुजन समाज पक्षाला १५, काँग्रेसला चार तसेच अपक्षांनी ४१ ठिकाणी नगराध्यक्ष पदे जिंकली. इतर १४ ठिकाणी वेगवेगळ्या पक्षांचे विजयी झाले आहेत. नगरसेवकही सर्वाधिक भाजपचे आहेत. नगरपंचायतींमध्येही हाच सिलसिला सुरू आहे. समाजवादी पक्षाचे नेते आझम खान यांचे प्रभावक्षेत्र असलेल्या रामपूरमध्ये नगराध्यक्षपदी आम आदमी पक्षाकडून रिंगणात उतरलेल्या सना खानम यांनी विजय मिळवला. त्यांनी भाजपच्या मसरत मुजीब यांचा पराभव केला. येथे समाजवादी पक्षाच्या फतिमा जबीन तिसऱ्या स्थानी राहिल्या. शिक्षिका असलेल्या सना यांचे पती ममून शहा हे आपचे पदाधिकारी आहेत. पूर्वी ते काँग्रेस पक्षात होते. रामपूर शहरात ते पूर्वीपासून कार्यरत आहेत. गेली वीस वर्षे येथे आझम खान यांचे प्रभुत्व आहे. मात्र यंदा या बालेकिल्ल्यात आपने प्रवेश केला.विरोधी पक्षांमध्ये एकी नव्हती त्याचाही लाभ भाजपला लाभ झाला. मुलायमसिंह यांच्यानंतर अखिलेश यादव यांच्याकडे समाजवादी पक्षाची धुरा आली असली तरी, अद्याप त्यांना सूर गवसलेला नाही हेच निकालांवरून दिसते. बहुजन समाज पक्षाने मतदान यंत्रांकडे बोट दाखवत, मतपत्रिकांवर मतदान झाले असते तर, निकाल वेगळा असता असा सूर लावला आहे. एकूणच लोकसभेपाठोपाठ विधानसभा आणि आता स्थानिक ठिकाणी भाजपची सत्ता, म्हणजे राज्यात भाजपचे तिहेरी इंजीन आहे. या निकालानंतर योगींचे नेतृत्व अधिक बळकट झाले आहे.

राजकीय

# महाराष्ट्रातही भाकरी फिरवणार?

**कर्नाटकमध्ये विधानसभेचा निकाल जाहीर होत होता. २०१३ पासून सत्तेवर असलेल्या काँग्रेसला अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळत होत्या. भाजपने बी. एस. येडियुरप्पांच्या नेतृत्वात १०४ आमदार निवडून आणले होते. पण, २२४ जागांच्या विधानसभेत बहुमतासाठी ११३ जागांची आवश्यकता होती. त्यामुळे भाजपला १०४ आमदारांवर सरकार बनवणं शक्य नव्हते. दुसरीकडे सत्ताधारी काँग्रेस दुसऱ्या स्थानावर गेला. त्यांच्या ८० जागा निवडून आल्या, तर स्थानिक पक्ष जनता दल सेक्युलर आणि इतर पक्षांना ३७ जागांवर यश आलं होतं. त्यानंतर काँग्रेसनं जेडीएसला मुख्यमंत्रिपदाची ऑफर देत, युती केली.**

खरंतर, काँग्रेससाठी जेडीएस म्हणजे, दक्षिणेतील शिवसेनाच होती. दोन्ही पक्षांनी उघड उघड युती करणं हे अनेकांना धक्का देणारं होतं. पण भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी आणि सत्ता कायम राखण्यासाठी काँग्रेसनं ३७ आमदार असलेल्या जेडीएसला मुख्ममंत्रीपदाची ऑफर दिली. त्यानंतर दोन्ही पक्षांनी आघाडी जाहीर केली. पण, त्याआधीच येडीयुरप्पांनी कर्नाटकात अल्प मतातलं सरकार स्थापन केलं होतं, इतकंच नाही तर राज्यपालांनी त्यांना बहुमत चाचणीसाठी १५ दिवसांची मुदत दिली. त्याविरोधात काँग्रेस-जेडीएसनं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर तीन दिवसांमध्येच बहुतम चाचणी करण्याचे आदेश दिले.

२२४ जागांच्या संपूर्ण विधानसभेत येडीयुरप्पांचं सरकार कोसळणार हे पक्कं होतं, त्यामुळे त्यांनी बहुमत चाचणीच्या १० मिनिटे आधी राजीनामा दिला. त्यानंतर काँग्रेस-जेडीएस आघाडीचं सरकार आलं. जेडीएसचे कुमारस्वारी कर्नाटकचे मुख्यमंत्री झाले. २३ मे २०१८ ला कुमारस्वामी यांच्या शपथविधीचा सोहळ्याची देशव्यापी चर्चा झाली. कारण, त्यांच्या शपथविधी सोहळ्यात सोनिया गांधी, शरद पवार, अखिलेश यादव, मायावती, तेजस्वी यादवांसह देशातले सगळेच विरोधक एकवटले होते. अरविंद केजरीवाल आणि ममता बॅनर्जींच्या अनुपस्थितीची चर्चा होती. पण, त्याच सोहळ्यानंतर लोकसभेत विरोधकांची एकजूट दिसणार हे जवळपास पक्क झालं होतं.

पण, १४ महिन्यातच म्हणजे जुलै २०१९मध्ये हे सरकार कोसळलं. कारण, ऑपरेशन लोटस! त्याचं झालं असं की सरकारमधील १६ आमदारांनी राजीनामा दिला. सरकारच्या पाठीशी असलेल्या २ आमदारांनी आपला पाठिंबा काढला आणि भाजपला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे १०५ आमदारांचा पक्ष १०७ वर पोहोचला. याच राजीनाम्यामुळे काँग्रेस-जेडीएसचं सराकर अल्पमतात आलं. शिवाय विधिमंडळातल्या बहुमतचा आकडा १०५वर आला होता आणि राजीनाम्यानंतर काँग्रेस-जेडीएसकडे १०१ आमदारांचा पाठिंबा होता. २३ जुलै २०१९ ला कुमारस्वामींना विश्वस ठरावाला सामोरं जावं लागलं. १०१ विरुद्ध १०७ अशा फरकानं कुमारस्वारी सरकार कोसळलं. २६ जुलैला येडीयुरप्पांनी पुन्हा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. १६ आमदारांचं प्रकरण कोर्टात गेलं. त्यानंतर डिसेंबरमध्ये १५ जागांसाठी पोटनिवडणुका झाल्या, ज्यामध्ये येडियुरप्पांनी पुढकार घेतला. १५ पैकी १२ जागांवर भाजपला विजय मिळाला. याच विजयानंतर भाजपचं संख्याबळ ११७ वर पोहोचलं आणि २२४ जागांच्या विधानसभेत भाजपचं सरकार स्थिर झालं.



पण, २६ जुलै २०२१ ला येडीयुरप्पांनी सक्रीय राजकारणातून दूर जाण्याचा निर्णय घेत मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर २८ जुलैला बसवराज बोम्मई यांची मुख्यमंत्रिपदी निवड झाली. पहिल्या दिवसांपासूनच बोम्मई यांनी 'कॉमन मॅन सीए' म्हणजेच सर्वसामान्यांचं सरकार अशी ओळख निर्माम करण्याचं काम केलं. पण, २०२२ मध्ये सराकरवर भ्रष्टाचाराचे आरोप सुरु झाले. निवडणुकांच्या तोंडावर ४० टक्के कमिशन सरकार असा आरोप सुरु झाला. त्याच आरोपांमुळे बोम्मई सरकारला १३ मे २०२३ रोजी पराभवाचा सामना करावा लागला. ११७ आमदारांचा पक्ष ६६ वर घसरला आणि काँग्रेसनं १३५ जागा मिळवतं, संपूर्ण बहुमत मिळवलं.

आता हेच चित्र महाराष्ट्रात दिसेल का? तर त्यासाठी २०२४ची वाट पहावी लागेल. पण, २०१८ ते २०२३... याच पाच वर्षांमध्ये ज्या काही राजकीय घडामोडी घडल्यात, अगदी तशाच घडामोडी महाराष्ट्रात २०१९ पासून सुरु आहेत. २०१८ साली कर्नाटकात भाजप सर्वाधिक जागा जिंकणारा पक्षा होता, पण संपूर्ण बहुमत नव्हतं. २०१९ मध्येही महाराष्ट्रात २८८ पैकी १०५ आमदार भाजपचे होते. पण त्यांच्याकडे संपूर्ण बहुमत नव्हतं. शिवसेना-भाजप युतीच्या १६१ जागा होत होत्या. पण, मुख्यमंत्रिपदावरुन घोडं आडलं आणि मविआची पेरणी झाली. ५६ आमदारांची शिवसेना, ५४ आमदार असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि ४४ आमदार असलेल्या काँग्रेसनं महाराष्ट्र विकास आघाडीची स्थापना केली. तिघांनीही एकत्र येत बहुमताचा १४५ वाला आकडा पार केला. २४ ऑक्टोबर २०१९ला महाराष्ट्राचा निकाल लागला होता. पण, राजकीय सत्तासंघर्ष इतका सुरु होता की सरकार कोण स्थापन करणार याकडे लक्ष होतं. मविआच्या बैठका सुरु होत्या. भाजपकडूनही हालाचाली सुरु होत्या.

२०१८मध्ये जो पेच कर्नाटकात होता, तोच पेच २०१९ला महाराष्ट्रात निर्माण झाला होता. मविआचा ठोस निर्णय होण्याआधीच २३ नोव्हेंबर २०१९ ला मोठा राजकीय ट्विस्ट आला. राष्ट्रवादीच्या अजित पवारांनी भाजपला पाठिंबा देत पहाटेचं सरकार स्थापन केलं. देवेंद्र फडणवीसांनी मुख्यमंत्री तर अजित पवारांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. पुढचे ७२ तास महाराष्ट्रात जे घडलं ते अवघ्या देशानं पाहिलं. शरद पवारांनी राष्ट्रवादीच्या अनेक आमदारांना परत आणलं आणि बहुमताचा आकडा मविआकडेच असल्याचं सिद्ध केलं. त्यातही खरी मविआला खरी मदत झाली ती कोर्टाच्या एका निर्णयाची. फडणवीसांकडे बहुमत नाही असं म्हणत, मविआनं कोर्टात धाव घेतली. कोर्टानं जेव्हा फडणवीसांना बहुमत चाचणी करण्याचे आदेश दिले गेले. तेव्हा त्यांनी गुप्त मतदानांची मागणी केली. पण मविआनं खुलं मदतान असावं अशी मागणी केली. त्यावर कोर्टानं उघड मतदान करण्यांचे आदेश दिले. इकडे आमदारांची संख्या कमी झाली होती, देवेंद्र फडणवीसांचं सरकार अल्पमतात आलं होतं. त्यामुळे २६ नोव्हेंबर २०१९लाच देवेंद्र फडणवीसांचं सरकार कोसळलं.

२०१८ मध्येही येडीयुरप्पांचंही सरकार अल्पमतातलं होतं. २०१९लाही देवेंद्र फडणवीसांचं सराकर अल्पमतातलं होतं. येडीयुरप्पांचं सराकरही बहुमत चाचणीआधीच कोसळलं, फडणवीसांचंही सरकार बहुमत चाचणीआधीच कोसळलं... हे योगायोग इथंच थांबले नाहीत तर आजही सुरु आहेत! त्यातला आणखी एक योगायोग आहे... ऑपरेशन लोटस.... जे कर्नाटकात झालं, तेच महाराष्ट्रात होणार? २०१८ साली जे घडलं, ते २०१९ साली महाराष्ट्रात घडलं. २०१९ साली जे कर्नाटकात घडलं, तेच २०२२ साली महाराष्ट्रात घडलं आणि आता २०२३ साली कर्नाटकात जे घडलंय, तसंच घडावं म्हणूनच की काय... मविआनं कर्नाटकच्या निकालानंतर दुसऱ्या दिवसापासूनच एकजूट आणखी मजबूत करण्याचे प्रयत्न केलेत. आता जे कर्नाटकात घडलं, तेच महाराष्ट्रात घडणार का? आतापर्यंतचा जो योगायोग सुरु होता, तोच २०२४ च्या निवडणुकांमध्येही दिसणार का? हे काही महिन्यांमध्येच कळेल!

**- शिशुपाल कदम.**

टुडेज् ब्लॉग

# आंब्यांच्या गावातच आंबा हरवलाय!

**कडक उन्हाळा, पाऊस मध्येच गारवा अशा वातावरणामुळे फळांचा राजा मात्र हिरमुसला आहे. कोकणची अर्थव्यवस्था मासे, आंबा, काजू, कोकम यांवर अवलंबून असते. हे सगळं निसर्गावरतीच अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांत निसर्गाची अनियमितता इतकी आहे की, सगळंच बेभरवशाचं झालेलं आहे. कशाचीही कुणाला खात्री देता येणारी नाही. कोरोना काळापासून आंबा विक्रीची एक नवी व्यवस्था तयार झाली. फार पूर्वी फक्त आंबा विक्री ही दलालांच्याच हातात होती. यामुळे कोकणातून जाणारा आंब्याचा दर दलाल ठरवतील तोच असायचा. दलालांकडून पाठवलेल्या आंब्याची किती पट्टी येईल हे काही ठरलेलं नसायचं. सगळा अर्थव्यवहार हा रुमालातून चालायचा. रुमालाखालच्या बोटांचा खेळ व्यावहारीदृष्टी कधीच शेतकऱ्यांचा विचार करून किंवा त्यांना न्याय देणारा नव्हती. जे काही होतं ते सगळं दलाल ठरवतील तोच दर ठरलेला असायचा. आंबा बागायतदार शेतकऱ्यांकडेही आंबा विक्रीची दुसरी कोणतीच व्यवस्था नव्हती. जेणेकरून आंबा दलालांच्या विळख्यातून शेतकरी बाहेर येईल. आंब्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचे जाळे निर्माण व्हायला हवे होते; परंतु तसे घडले नाही. प्रक्रिया उद्योगांकडे फारसे कोणी लक्षच घातले नाही.**



शासकीय स्तरावरही आंबे, मासे हा फक्त त्यांच्या पानात असावा यासाठी त्यांचा आग्रहच राहिला; परंतु आंबा, मासे यांचे उद्योग उभे राहण्यासाठी शासकीय स्तरावर कोणतेही प्रयत्न झाले नाहीत. सहकार क्षेत्रातूनही आंब्यासाठी काही केले गेले नाही. मात्र, 'महामँगो' संस्थेच्या निर्मितीतून प्रयत्न झाला. आंबा परदेशात पाठविण्याचा तो प्रयत्न झाला. या महामँगोसाठी सहकार क्षेत्रातील अग्रणी शिवरामभाऊ जाधव आणि स्व. प्रा. डी. बी. ढोलम यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले; परंतु आंबा परदेशी पाठवण्याच्या नियोजनात ज्या यंत्रणेकडून जाणीवपूर्वक घोळ घालून महामँगो संस्थेच्या माध्यमातून करण्यात आलेला प्रयत्न मोडीत काढण्यात आला. यात नाबार्डसह काही अधिकाऱ्यांनी हे जाणीवपूर्वक केले. एकीकडे आंबा विक्री व्यवसाय हा अशा पद्धतीने अडचणीत असताना यावर्षी आंबा उत्पादनच मंदावले आहे. कोकणात जो अवकाळी पाऊस पडला त्याचबरोबर मार्च महिन्यात ३८,३९ अंश सेल्सिअस तापमान झाले. यामुळे छोटी-छोटी फळं गळून पडली. आंबा गळण्याचे प्रमाण इतके होते, यातच शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात काही आंबा तयार झाला; परंतु त्यानंतर आता एवढ्यात आंबा तयार होण्याची शक्यता कमी आहे. देवगड, नाणार, कुंभवडे या भागात कामानिमित्ताने जाण्याचा योग आला. ज्या आंबा बागायतदारांच्या दारात आंब्याची रास पडलेली दिसायची; परंतु यावेळी मात्र डझन-दोन डझन आंबाही नजरेस पडला नाही. काही आंबा बागायतदारांच्या बागेतील झाडावर आहे; परंतु हा आंबा झाडावरून पेटीत बंद होईपर्यंत कोणतीही शाश्वती नाही. यातच फळमाशांच्या प्रादुर्भावाने हाता-तोंडाशी आलेले आंबा पीक या फळमाशीने वाट लावल्याचे दिसते. आंबा पेटी भरणे हे काम करणारा मजूर, आंबा बॉक्स बनवणारा कारखानदार अशा सर्वांनाच याचा मोठा फटका बसला आहे. याचा मोठा परिणाम झालेला दिसतो. यात जसा आंबा बागायतदाराचा तोटा आहे, तसाच तो या आंबा व्यवसायाशी संबंधित आहे. सर्वांनाच त्यातून त्यांचे-त्यांचे आर्थिक गणित बिघडवणारेही आहे. हे नुकसान कितीतरी पातळीवरचे आहे. शेवटी आंबा व्यवसायातून येणारा पैसा बाजारात फिरत असतो. ती बाजारातली उलाढालच थांबली आहे. सुरुवातीला ज्यांच्या बागेत आंबे झाले त्यांना चांगले पैसे मिळाले; परंतु आताचा हा मधला कालावधी आंबा व्यवसायाच्या दृष्टीने नुकसानकारक ठरला आहे. शाळा-कॉलेजमध्ये शिकणारी गोरगरीब, सर्वसामान्य मुलं आंबा हंगामात वर्षभरात लागणाऱ्या वह्या-पुस्तके, कपड्यांसाठी मजुरी करून या पैशांची व्यवस्था करायचे. सुट्टीत काम करणाऱ्या मुलांची संख्याही काही कमी नव्हती; परंतु यावर्षी काहीच काम नाही अशीच त्यांची स्थिती आहे. यामुळे शाळा-कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही त्याचा फटका बसला आहे. निसर्गाच्या या विचित्र हवामान अवस्थेचा परिणाम कोणा-कोणावर आणि कशा पद्धतीने होतो आहे, हे दिसून येत आहे.

**- संतोष वायंगणकर.**

जन्म हा अखेरचा

## इंद्रियानुग्रहस्थल - १



भगवान शिव आपल्या विषारी सर्पांना आपल्या अंगावर अलंकाराप्रमाणे धारण करतात, तर विष्णू विषारी शेषशय्येवर सुखनिद्रा घेतात. शिव-विष्णूंना विषारी बाधा हाते नाही याचे कारण भोग्य वस्तूंच्या सहवासात राहूनही ते भोगी नाहीत. त्यांच्या मनात कशाबद्दल राग नाही आणि द्वेषही नाही. राग-द्वेष उत्पन्न होत नसतील तर इंद्रियांचा विषयांशी संबंध आला तरी तो बाधक ठरत नाही. सामान्य माणसाच्या बाबतीत इंद्रिय-विषयांच्या संबंधाने राग-द्वेष उत्पन्न होतो, परंतु योग्यांच्या बाबतीत मात्र असे घडत नाही.

विचार केला असता असे आढळून येईल की, प्रत्येक मनुष्य कुणावर तरी प्रेम करतो आणि कुणाचा तरी द्वेष करतो. राग-द्वेषामुळेच जन्म घ्यावा लागतो आणि त्यांच्यामुळेच मृत्यू पत्करावा लागतो. रात्री कमळाच्या पाकळ्यात बंदिस्त झालेला भुंगा तेथेच आपले प्राण सोडतो, परंतु कमळाची पाकळी भेदून बाहेर मात्र येत नाही. याचे कारण त्याच्या मनात कमळाविषयी अनुराग असतो हे आहे. अशीच अवस्था सर्व मनुष्यांची असते. राग-द्वेष नष्ट झाल्यामुळे त्याच्या इंद्रियांत भक्तांवर अनुग्रह करण्याचे सामर्थ्य येते.

**इंद्रियाणां बहिर्वृत्तिः प्रपंचस्य प्रकाशिनी ।**
**अन्तः शिवे समावेशी निष्प्रपंचस्य कारणम् ।। १७.१६।।**

आपली इंद्रिये बहिर्मुख असतात म्हणून आपल्याला प्रपंच दिसत असतो. जेव्हा आपण झोपतो तेव्हा आपल्या दृष्टीसमोरुन जग नाहीसे झाले असते. जेव्हा आपल्याला गाढ झोप लागते तेव्हा बाह्य जग दिसत नाही की स्वप्नातले जग. बहिर्मुख इंद्रियांतून आपले मन प्रपंचाकडे पाहत असते. मनच नेत्राद्वारे रुपाचा, कानाद्वारे शब्दाचा, रसनेद्वारे रसाचा, नाकाद्वारे गंधाचा आणि त्वचेच्या द्वारे स्पर्शाचा अनुभव घेत असते.

मन इंद्रियांद्वारे जेव्हा बाहेर पाहते तेव्हा त्याला प्रपंच दिसत असतो. जागेपणी आपण जग पाहत असतो आणि स्वप्नातही तेच पाहत असते. पाहत असतो याचे एकच कारण आहे. आपली मनोवृत्ती अंतर्मुख नाही. निर्मितीच्या वेळी मनुष्याची इंद्रिये बहिर्मुख करुन ठेवली आहेत. म्हणून तो बाह्यरुप पाहू शकतो. परंतु त्याला आतले रुप मात्र दिसत नाही. बाहेरचा शब्द ऐकू शकतो, परंतु आतला अशब्द ऐकता येत नाही. बाह्यस्पर्श अनुभवू शकतो. परंतु आतला अस्पर्श त्याला अनुभवता येत नाही. बहिर्मुख इंद्रियांशी मनाचा संबंध असल्यामुळे आपल्याला प्रपंच दिसत असतो.

**(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## लग्न समारंभाचे बदलते स्वरूप...

विवाह म्हणजे दोन जीवांचे मिलन. विवाह संस्काराला हिंदू धर्मात अनन्य साधारण महत्व आहे. या संस्कारातील प्रत्येक विधी ही अत्यंत महत्वपूर्ण असून पती पत्नीला त्यांच्या भावी संसारिक आयुष्यातील कर्तव्यांचे पालन कसे करावे, याचा परिपाठ करून देणारी असते त्यामुळे त्या विधींना पूर्वी अत्यंत महत्व दिले जात असे.

आज मात्र परिस्थिती बदलली आहे. हल्लीचे विवाह पाहिल्यास विवाहाच्या आधीच्या हळद, उटणे समारंभाचा सर्रास इव्हेन्ट केला जातो. या दिवशी तालात नाचण्यासाठी जवळच्या नातेवाईकांचा एक महिना आधीपासून सराव चाललेला असतो, त्यासाठी कोरिओग्राफर आणला जातो, लग्नाच्या मंडपात वधू वराचा प्रवेश हाही एक मोठा सोहळा असतो. हल्ली मंगलाष्टके ब्राह्मणाच्या तोंडून नव्हे तर त्यासाठी खास ऑर्केस्ट्रासह मागवलेल्या गायकाच्या तोंडून ऐकणे लोकांना अधिक पसंत आहे. वधू वरांचा एकमेकांना हार घालण्याचा कार्यक्रम एकमेकांना उचलून रंजक करण्याचे आता जणू फॅडच झाले आहे.



लग्नाच्या दिवशीही स्टेजवर ठरवून बसवलेल्या नृत्याचे कार्यक्रम मनोरंजनासाठी असतातच. प्री वेडिंग शूट आणि फोटोग्राफी या नवीन प्रकाराची लग्नाच्या कार्यक्रमात नव्याने भर पडली आहे. लग्नाच्या वरातीत कानठळ्या बसवणारा डीजे तर सर्वांनाच लागतो. हा सर्व भंपक देखावा ही हल्लीच्या लग्नातील प्राथमिकता झाली असून धार्मिक लग्नविधींना दुय्यम स्थान दिले जाऊ लागले आहे. या १-२ दिवसांच्या देखाव्यासाठी लक्षावधी रुपये उडवले जातात. लग्न हा आयुष्यात एकदा येणारा दिवस असल्याने तो यादगार करणे जरी योग्य असले, तरी त्यासाठी पैशांचा चुराडा करून महत्वाच्या लग्न संस्कारांना दुय्यम दर्जा देणे न पटणारे आहे, याचा युवापिढीने विचार करावा.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

*जागतिक तापमान वाढीबद्दल सगळ्यांनाच वरवर कल्पना, गांभीर्य आहे. मात्र आजच्या परिस्थितीचा विचार केला तर पृथ्वी तलावरील बुद्धीमान समजल्या जाणाऱ्या मानवाने या जागतिक तापमान वाढीबद्दल जागरूक राहून वेळीच गांभीर्याने घेणे ही काळाची गरज झाली आहे. रोजच वृत्तपत्रात जागतिक तापमान वाढ अर्थात 'ग्लोबल वॉर्मिंग' याविषयी काहीतरी वाचत असतो, जागतिक स्तरावरील तापमानवाढ विषयी मात्र हे सगळे वाचूनही या सगळ्यावर आपण दुर्लक्ष करतो ? मात्र पृथ्वी दिवसेंदिवस जळत आहे, आणि यामुळे मानवी जीवन एक दिवस पूर्णपणे नष्ट होणार आहे असा विचार केला तर या समस्येची जाणीव आपल्याला झाल्याशिवाय राहणार नाही. मानवाला प्रगतीच्या पायऱ्या चढवणारी वाढती औद्योगिक क्रांती आणि वाढत चाललेल्या नैसर्गिक मानवाच्या हस्तक्षेपामुळे एक दिवस बुद्धिमान समजणाऱ्या मानव जातीचाच घात करणार , याची कल्पना आपल्याला यायला हवी ?*

# जागतिक तापमान वाढ विषयी गांभीर्य आहे का ?

कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळजन्य परिस्थिती, कुठं नदीला आलेला भयावह पूर तर कधी तापून टाकणारे कडकडीत ऊन, तर कधी गोठवून टाकणारी थंडी तर अचानक आलेली चक्रीवादळ काही ना काही विचित्रच? घडताना दिसत आहे याचे कारण निसर्गाचे चक्र विस्कळीत होत आहे, हे सर्वांनी समोर प्रचंड मोठे प्रश्नचिन्ह? उभे करत आहे. ग्लोबल वार्मिंग, क्लायमेट चेंज वातावरणात झालेले बदल यासारखे एक ना अनेक कारणे त्यामागे आहेत म्हणून हे बिघडलेलं निसर्गाचं चक्र पूर्वपदावर आणण्यासाठी करण्यात येणाऱ्या योजना यातील प्रमुख उपाय म्हणजे 'ग्रीन कव्हर'!

उन्हात पाऊस, पावसाळ्यात कडक ऊन, हिवाळ्यात उष्णता हे आपण जाणवत असतानाच भारतात निसर्गाच्या चक्रात बदल होत आहेत, आता तर कधी पाऊस आणि कधी काय होईल हे सांगता न येणार ऋतू बदलाला सर्वांनी वेळीच गांभीर्याने घेणे महत्त्वाचे आहे, गेल्या काही वर्षापासून तापमानातील झपाटाने होत चाललेले बदल त्याने अति उच्चांक गाठायला सुरुवात केली असून अधिक व त्याहुनही अधिक अंश सेल्सिअस तापमान पार करताना हे चित्र दिसत आहे हे चिंताजनक आहे. येणाऱ्या काळात देशभरातील सरासरीपेक्षा जास्त असलेले असेही अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तवले असून थंडी , ऊन आणि पाऊस या भारतातील तिन्ही ऋतूचे वेळापत्रक गेल्या काही दशकापासून बदलत चाललेले आहे, त्याचा परिणाम आपल्याबरोबरच सर्व घटकावर होताना दिसत असून ही वेळीच गांभीर्याने घेत प्रत्येक नागरिकांनी करते म्हणून कार्य करणे आज काळाची गरज होत चालली आहे.




औद्योगिकरण, नागरिकरण, नवनवीन तंत्रज्ञान, लोकसंख्या वाढ, वाढती वृक्षतोड, महायुद्धे, रासायनिक खते, कीटकनाशके, अणुबॉम्ब चाचण्या, ऋतूचे वाढते तापमान आदि अनेक कारणामुळे पर्यावरणाच्या परिसंस्थेमध्ये भूप्रदूषण, जलप्रदूषण, वायूप्रदूषण याचे प्रचंड वाढलेले प्रमाण दिसत असून, याचा गांभीर्यपूर्वक परिणाम मानवाच्या आणि पर्यावरणाच्या अस्तित्वावर होत असून पर्यावरणाबरोबरच मानवीय संतुलन बिघडत चाललेले दिसत आहे. पर्यावरणातील या मोठ्या बदलामुळे पृथ्वीचे तापमान वाढत चालले असून जागतिक स्तरावर अभ्यास करून सोडवणे, भविष्यासाठी गरजेचे आहे. जागतिक तापमान वाढ मर्यादेत ठेवण्यासाठी वेळ निघून चालली असून सध्याचे कार्बन उत्सर्जन बघता त्यातून मोठा धोका होऊ शकतो, असे मत हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. वेळीच ही परिस्थिती लक्षात घेऊन सर्वांनी कर्तव्य म्हणून पाऊल उचलणे आज काळाची गरज बनली आहे, नाही तर येणारा काळ आपल्याला माफ करणार नाही येणाऱ्या संकटाला सर्वांना निश्चितच सामोरे जावे लागेल.

**- राहुल मोरे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# रिक्षा आणि दुचाकीचा अपघात; ५ जण जखमी

सुराज्य/सोलापूर



रिक्षा आणि दुचाकीची धडक झाल्याने दोन्ही वाहनातील ५ जण जखमी झाले . हा अपघात विजापूर रोडवरील पत्रकार भवनाजवळ सोमवारी दुपारच्या सुमारास घडला . सर्व जखमींना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. स्नेहलता क्षीरसागर (वय ४०) अनुकली क्षीरसागर (वय १९ रा.महालक्ष्मी नगर) आणि सतीश धडे (वय ४९ रा. पसारे वस्ती) असे रिक्षा उलटून जखमी झालेल्यांची नावे आहेत.

ते सर्वजण रिक्षातून मधला मारुती ते विजापूर नाकाच्या दिशेने निघाले होते. दुपारी बारा वाजेच्या सुमारास समोरून दुचाकी धडकल्याने दुचाकी वरील चांदसाहब शेख (वय ३८) आणि त्याचे वडील हनीफ शेख (वय ६५ रा.सलगर वस्ती) हे जखमी झाले. या अपघाताची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

# २६ कोटींच्या कामांना महापालिका आयुक्तांची मंजुरी

## पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्याचे दिले आदेश

सुराज्य/सोलापूर

**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना, धुळमुक्त शहर तसेच अल्पसंख्याक योजनेमधील २६ कोटींच्या कामांना महापालिका आयुक्तांनी मंजुरी दिली असून पावसाळ्यापूर्वी ही कामे करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.**

आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. प्रणिती शिंदे आणि खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांनी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना जिल्हास्तर मधून शहर आणि हद्दवाढ भागात जवळपास १५ कोटींची ८१ कामे सुचवली होती. या कामांना नियोजन समितीकडून मंजुरी मिळाल्यानंतर महानगरपालिका नगर अभियंता विभागाच्यावतीने ८१ कामांची यादी करून कामाचे टेंडर प्रसिद्ध करण्यात आले होते. याशिवाय धूळ मुक्त शहर या योजनेतून १० कोटींच्या निधीमधून आठ रस्ते करण्यात येणार आहेत तसेच अल्पसंख्यांक



योजनेमधून १० रस्ते होणार आहेत. यासाठी एक कोटीचा निधी प्राप्त झाला आहे. अशा शहर आणि हद्दवाढ भागातील एकूण ९५ रस्त्यांच्या कामांना



महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी मंजुरी दिली आहे. ही सर्व काम तात्काळ सुरू करून पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्यात यावी असे आदेशही त्यांनी दिले आहेत.

याबाबत नगर अभियंता रस्ते विभागाच्या वतीने तात्काळ कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. पुढील आठवड्यात शहर आणि हद्दवाढ भागातील २६ कोटींच्या कामांना सुरुवात होणार आहे.

शहरातील शहर मध्य, शहर उत्तर आणि दक्षिण सोलापूर मतदार संघातील सोलापूर शहराच्या भागात खासदार आणि आमदारांनी सुचवलेल्या ८१ कामांच्या टेंडर प्रक्रियेनंतर ती काम आता हाती घेण्यात येणार आहेत. एकूण १५ कोटींचे काँक्रिट आणि डांबरी रस्ते तयार करण्यात येणार आहेत.

याशिवाय धुळमुक्त शहर योजनेतून ८ रस्ते करण्यात येणार आहेत तसेच अल्पसंख्यांक योजनेमधून १० रस्ते होणार आहेत अशा शहर आणि हद्दवाढ भागातील एकूण ९५ रस्त्यांच्या कामांना महापालिकेची मंजुरी मिळाली आहे.



# मंद्रुप पोलिसांकडून गुटखा जप्त

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप पोलिसांनी अवैध गुटखा करणाऱ्या वाहतुकीवर धाड टाकत वाहनासह ३७ लाखांचा गुटखा जप्त केला.

१४ मे २०२३ रोजी गोपनीय माहितीनुसार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे, मंद्रुप पोलीस स्टेशनाचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे ए.एस. आय संदीप काशीद, पोलीस शिपाई संदीप काळे यांना नांदणी गावाच्या हद्दीत दोन अशोक लेलंड कंपनीचे टेम्पोमध्ये गुटखा वाहतुक होणार असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार सदर दोन टेम्पो पकडून त्यांनी ड्रायवर कडे विचारपूस केली असता त्यांनी सदर टेम्पो मध्ये हिरा गुटखा असल्याचे सांगितले. सदरची दोन्ही वाहने पोलीस स्टेशन येथे आणून त्याबाबत अन्न व सुरक्षा विभागाचे अधिकारी यांना कळविले. त्यानुसार त्यांनी दि.१५ मे २०२३ रोजी मंद्रुप पोलीस स्टेशन येथे येऊन कारवाई करून ४ आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नईम रहीम शेख (वय - ४०वर्षे रा. मोमीनपुरा हुजरा मस्जिद जवळ,बीड) ,वाहन चालक- राहुल सिध्दाराम काळे (वय - ३० वर्षे रा. नांदणी तालुका दक्षिण सोलापूर), साठा मालक -फैयाज शेख (रा. बार्शी नाका, इमामपूर रोड),वाहनाचे मालक जैनुद्दीन शेखर शेख अशी आरोपींची नावे आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिरीषकुमार सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रुप पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांच्या नेतृत्वात साहेब पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे, ए.एस.आय संदीप काशीद, पोलीस शिपाई संदीप काळे , दिनेश पवार, माजिद शेख यांनी केली आहे. पुढील अधिकचा तपास होणे प्रकरण शाखेचे ए.एस. आय. संदीप काशीद करीत आहेत.

# दूधदर कपातीच्या विरोधात 'रयत' उतरली रस्त्यावर

## दुध ओतून निर्णयाचा निषेध ; अन्यथा...जिल्ह्यात दुधाचा एकही टँकर फिरू न देण्याचा इशारा

सुराज्य/सोलापूर

शेतकरी शेतीला जोड व्यवसाय म्हणून दुध उत्पादन करत आहे, खाजगी व सहकारी दुध संघांनी एकत्र येऊन दुधाचे दर कमी केले आहेत. महाराष्ट्रात कोणत्याही जिल्ह्यात दर कमी केले नाहीत तर फक्त सोलापूर जिल्ह्यातच गाईच्या व म्हशीच्या दुधाला प्रती लिटर ३/४ दर कमी करण्यात आला आहे. खाजगी व सहकारी दुध संघ आणि राज्य सरकारच्या विरोधात रस्त्यावर दुध ओतून आंदोलन करण्यात आले. जर सरकारने आमच्या मागण्या मान्य नाही केल्या तर जिल्ह्यात दुधाचा एकही टँकर फिरू देणार नसल्याचा इशारा रस्ता रोको प्रसंगी देण्यात आला.

पंढरपूर ते मंगळवेढा रस्त्यावरील एकलासपूर येथे रयत क्रांती संघटना, दुध उत्पादक शेतकरी, सर्व राजकीय पक्ष, छावा संघटना वतीने रस्ता रोको करण्यात आले. सोलापूर जिल्हात दुधाचे दर जानिवपुर्वक प्रती लिटर ३ ते ४ रुपये कमी करण्यात आला आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत आला आहे. द्राक्षबागा, डाळींब, कांदा भाजिपाला उत्पादक शेतकरी असेल अडचणीत असताना, शेतीला जोड व्यवसाय म्हणून दूध उत्पादक करत आहे. परंतु दुधाचे दर पाडण्याचे काम सोनाई दुध संघाचे अध्यक्ष दशरथ माने हे करत आहे. शेजारच्या राज्यातील दुधसंघ जास्तीचा दर देत असताना दशरथ माने हे त्यांना दमदाटी करून दर कमी करा असे सांगत आहेत. असा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला.

जिल्ह्यात खाजगी दूध संघांनी शेतकऱ्यांना दिवसा लुटण्याचा प्रकार सुरू केला असून याचे प्रमुख सोनाई दूध संघाचे अध्यक्ष दशरथ माने हे मनमानी पद्धतीने निर्णय शेतकऱ्यांवर लादत आहेत. ऐन उन्हाळ्यात दर वाढविण्या ऐवजी कमी करून शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे पाप ते करीत आहेत. तेच याला कारणीभूत आहेत.असा गंभीर आरोप करीत त्यांचा विरोधात प्रचंड घोषणाबाजी करीत दूध उत्पादकांनी जाहीर निषेध व्यक्त केला.



### दूध उत्पादकांच्या मागण्या

- गाईच्या दूधाला प्रती लिटर ४० रुपये दर मिळाला पाहिजे
- म्हशीच्या दूधाला प्रती लिटर ७० मिळालाच पाहिजे
- ऊसाच्या एफआरपी प्रमाणे दुधाचा दर एफआरपी मिळावी.
- भेसळयुक्त दूधावर बंदी आणून मोक्काअंतर्गत गुन्हे दाखल करावेत.
- लुटमार विरोधी कायदा करावा.
- खाजगी व सहकारी दूधाचे ऑडीट करावे.
- लंम्पी आजारावर त्वरीत लसीकरण करण्यात यावे

हा रस्ता रोको रयत क्रांती संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष दिपक भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी योगेश ताड, नितीन ताड, रूपेश वाय, दत्ता ताड, विक्रम वाडेकर, प्रविण घाडगे, सुधीर घाडगे, शहाजी ताड, सावरकर शिंदे, सुनिल शिंदे, दादा जाधव, दत्ता ताड, संभाजी पाटील, दादा कवडे, समाधान जाधव, नंदू आवताडे, समाधान ताड, आण्णा ताड, दाजी ताड, नागेश ताडसह दुध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येनेउपस्थित होते. यावेळी मागण्याचे निवेदन देण्यात आले. तालुका पोलिसांनी चोक बंदोबस्त ठेवला होता.

# सोलापूर ते सिंदखेडराजा बस सेवेस प्रारंभ

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रमाता जिजाऊ यांचे जन्मस्थान, इतिहासिक आणि पर्यटन भूमी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे जाण्यासाठी सोलापूरमधून थेट बस उपलब्ध नव्हती.

यासाठी प्रवासी सेवा संघाच्या वतीने राज्य परिवहन महामंडळास पाठपुरावा करून बार्शी आगारातून सोलापूर ते सिंदखेडराजा बस सेवेस छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सवाच्या निमित्ताने प्रारंभ करण्यात आला. जिजाऊ ब्रिगेडच्या पदाधिकारी निर्मला शेळवणे यांच्या हस्ते बसचे पूजन करण्यात आले.

मराठा सेवा संघाचे राम गायकवाड यांच्या हस्ते चालक दयानंद जाधवर व वाहक जीवन भातलवंडे यांचा सत्कार करण्यात आला.

मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे लखुजीराजे यांची भुईकोट गढी, लखुजीराजे यांचे समाधी स्थळ, रंगमहाल, आठ बारव, मोती तलाव, शिवधर्म पीठ, जिजाऊ सृष्टी अशी प्रेक्षणीय स्थळे आहेत. ही बससेवा उपलब्ध झाल्याने या स्थळांना भेटी देणे सुलभ झाले आहे. या सेवेसाठी पाठपुरावा केलेल्या प्रवासी सेवा संघ आणि राज्य परिवहन महामंडळाचे आभार आणि जास्तीत जास्त प्रवाशांनी लाभ घेण्याचे आवाहन मराठा सेवा संघाचे राम गायकवाड यांनी केले.

सोलापूर ते सिंदखेडराजा अशी बसफेरी सुरू केल्याबद्दल मंडळ सोलापूरचे विभाग नियंत्रक विनोदकुमार भालेराव, विभागीय वाहतूक अधिकारी अजय पाटील बार्शी आगार व्यवस्थापक मधुरा जाधवर तसेच वाहतूक नियंत्रक चालन, वाहतूक शाखेचे केतन ताकपेरे यांचे प्रवासी सेवा संघाचे अध्यक्ष संजय पाटील यांनी आभार व्यक्त केले.या प्रसंगी प्रवासी सेवा संघाचे नंदू दळवी, निखिल दळवी, पोपट भोसले, संभाजी पवार, सरस्वती पवार, प्रकाश शिंदे, बाबूराव माने उपस्थित होते.

# कनेक्शन बंद असतानाही आकडा टाकून वीज चोरली

सुराज्य/सोलापूर

## ▶▶ ३२९ ग्राहकांवर गुन्हे दाखल; ३८ लाखांचा दंड
## ▶▶ सर्वाधिक २१५ गुन्हे पंढरपूर विभागात

महावितरणने वीज कनेक्शन कायम स्वरुपी बंद असणाऱ्या ग्राहकांची मागील काही दिवसांत फेर तपासणी केली असता धक्कादायक माहिती पुढे आली आहे. या बंद कनेक्शनच्या ठिकाणी आकडा टाकून वीजचोरी करणे किंवा शेजारील ग्राहकांकडून बेकायदा वीज वापरणे यासारखे प्रकार आढळले आहेत. ३२९ ठिकाणी पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहे तर ३८ लाखांचा दंड केला आहे. बारामती परिमंडलातील सोलापूर जिल्हातील पंढरपूर विभागात २१५ गुन्हे दाखल केले आहेत.

वारंवार पाठपुरावा करुनही एखाद्या ग्राहकाने वीजबिल भरले नाही तर महावितरणकडून कनेक्शन तात्पुरते बंद केले



जाते. पुढील तीन महिन्यातही जर थकबाकीचा भरणा केला नाही तर मात्र कनेक्शन कायमस्वरुपी बंद केले जाते. जोपर्यंत त्या बंद कनेक्शनची थकबाकी व्याज व दंडासहित भरली जात नाही तोवर त्या जागेवर नवीन कनेक्शन दिले जात नाही. बारामती परिमंडलात अशा प्रकारच्या ५ हजारांहून अधिक प्रकरणांची पडताळणी झाली.

ज्या ठिकाणी थकबाकीचा भरणा झाला. त्यांना वगळून तब्बल ३२९ प्रकरणांत संबंधित पोलीस ठाण्यात त्या ग्राहकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. या प्रकरणी तब्बल ३७ लाख ९५ हजारांचा दंड वसूल होणे अपेक्षित आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांचे मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यभर अशा प्रकारची मोहीम राबविण्यात आली. बारामती परिमंडलात मुख्य अभियंता यांच्या नेतृत्वाखाली महावितरणच्या सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी या प्रकरणी धडक कारवाई केली. त्यातून सातारा जिल्ह्यात १ तर सोलापूर जिल्ह्यात तब्बल २७३ तसेच बारामती मंडलात ५५ असे एकूण ३२९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महावितरणच्या या धडक कारवाईने परिसरातील वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.

# मार्च-एप्रिल सत्राच्या परीक्षेसाठी अर्ज भरण्यास सुरुवात

## २५ मे पर्यंत प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन गुण अपलोड करा : कुलसचिव योगिनी घारे

सुराज्य/सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या मार्च-एप्रिल २०२३ सत्राच्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपुर यांनी दिली. याचबरोबर विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा देखील घेऊन दि. २५ मे २०२३ पर्यंत विद्यापीठाच्या संगणक प्रणालीत गुण अपलोड करण्याचे निर्देशदेखील परीक्षा विभागाकडून संबंधित महाविद्यालयांना देण्यात आले आहेत.

विद्यापीठाचे नूतन प्रभारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या मार्गदर्शनाखाली माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ च्या विविध अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत तर काही अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर होत आहेत.

अशा विद्यार्थ्यांसाठी आता मार्च-एप्रिल २०२३ सत्राच्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. या परीक्षा आता जून-जुलैमध्ये होणार आहेत. याचे नियोजन विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षा अर्ज भरण्याची मुदत व संबंधित अभ्यासक्रमांच्या शुल्क रक्कमची माहिती देण्यात आली आहे. यासंदर्भात महाविद्यालय व संकुलाकडून विद्यार्थ्यांना माहिती देऊन परीक्षा अर्ज भरून घेण्याचे नियोजन करावे, असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

# सासरी आलेल्या जावयास मारहाण; पत्नी मेव्हणा आणि सासऱ्यावर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

घरातून न सांगता निघून गेलेल्या पत्नीचा शोध घेत सासरी आलेल्या जावयाला काठी, लाथाबुक्क्या आणि कुऱ्हाडीच्या दांडक्याने मारून जखमी करण्यात आले.

ही घटना कुरनुर (ता. अक्कलकोट) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात अक्कलकोट उत्तरच्या पोलिसांनी जखमीची पत्नी, दोन मेहुणे आणि सासऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विभीषण केरबा वाघमारे (वय ३८, रा. बार्शी रोड लातूर) असे जखमीचे नाव आहे. त्यानी दिलेल्या फिर्यादीवरून त्याची पत्नी कोमल वाघमारे, दोन मेहुणे बालाजी आणि शिवा कांबळे तसेच सासरे विभीषण कांबळे (सर्व रा. कुरनूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. विभीषण वाघमारे याची पत्नी कोमल ही न सांगता घरातून गेली होती. तिचे पती विभीषण वाघमारे हा तिचा शोध घेत रविवारी सकाळी सासरी गेले होते. पत्नीला पाहिल्यानंतर तू न सांगता माहेरी का गेली? असे विचारिले असता पत्नीने त्याला पकडून ठेवले. तर मेव्हणे आणि सासऱ्यांनी त्याला बेदम मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार कलशेट्टी पुढील तपास करीत आहेत.

# कुत्र्यांच्या चाव्याने बालकाचा मृत्यू

## कुटुंबाला आर्थिक मदत देण्याची मागणी

सुराज्य/सोलापूर

शहरातील शास्त्रीनगर येथील पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतलेल्या एका ८ वर्षीय बालकाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे येथील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, शास्त्रीनगर येथील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करून मयत बालकाच्या कुटुंबाला आर्थिक मदत द्या अशा मागणीचे निवेदन तोहीद सामाजिक संघटना व शहर मध्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष वाहिद विजापुरे यांच्या वतीने महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांना सोमवारी देण्यात आले.

शहरातील प्रभाग क्रमांक २८ परिसरातील भटक्या आणि पिसळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा अशी मागणी शहर मध्यचे युवक अध्यक्ष वाहिद विजापुरे यांच्यासह कुत्र्यांनी चावा घेतलेल्या जखमी बाल व नागरिकांच्या उपस्थितीत मनपा उपायुक्त विद्या पोळ यांना निवेदन दिले होते. दरम्यान, पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतल्यामुळे यापैकीच ८ वर्षीय बालकाचा रविवारी मृत्यू झाला आहे. त्यामुळे शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांनी मोठा संताप व्यक्त केला आहे.

या भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त महापालिकेने त्वरित करावा, कुत्र्याने चावा घेतल्यामुळे मृत्यू झालेल्या बालकाच्या कुटुंबास शासकीय मदत द्यावी, यासंदर्भात कार्यवाही करावी अशा मागणीचे निवेदन संघटनेच्या वतीने देण्यात आले. येत्या आठ दिवसात शास्त्रीनगर परिसरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त न केल्यास, यापुढे अशा घटना घडल्यास याला संपूर्ण जबाबदार महापालिकेचे प्रशासन राहील असेही संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. यावेळी वसीम शेख, अजीम शेख, अजित शेख, निजाम इनामदार, बबू महाजन, रोशन अंतरगंगी, शहनाज महाजन, रफियाना शेख, बीबी शेख, शाहीन शेख यांच्यासह शास्त्रीनगर परिसरातील नागरिक उपस्थित होते.



### मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन

शास्त्रीनगर येथील मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्यामुळे एका आठ वर्षीय बालकाचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे. याविषयी येथील आमदाराचे पत्र आणावे. हे पत्र महापालिकेच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी मदत कक्षा कडे पाठवण्यात येईल. त्यासाठी महापालिका प्रशासन पाठपुरावा करेल, असे आश्वासन महापालिका आयुक्त यांनी दिले असल्याची माहिती वाहिद विजापूरे यांनी दिली.

# महापालिकेच्या सर्वंकष मिळकती सर्वेक्षणास सुरुवात

## एकूण ११३ कर्मचाऱ्यांची पथके कार्यरत



✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिका प्रशासनाच्यावतीने मिळकत, नळ कनेक्शन यासह विविध घटकांच्या सर्वंकष सर्वेक्षणास सोमवारपासून सुरुवात करण्यात आली आहे. नियोजनबद्ध कृती आराखड्यानुसार एकूण ११३ कर्मचाऱ्यांची पथके कार्यरत असून २६३ कर्मचाऱ्यांमार्फत हे सर्वेक्षण करण्यात येत आहे. घरोघरी जाऊन हे सर्वेक्षण केले जात आहे.

महापालिकेच्या इतिहासात प्रथमच अशा प्रकारे सर्वंकष असा मिळकतींचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त विद्या पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली हे महत्त्वपूर्ण सर्वेक्षण करण्यात येत आहे. महापालिकेच्या वतीने सोलापूर शहरातील सर्व मिळकती, नळ कनेक्शन, ड्रेनेज कनेक्शन, प्रॉपर्टी कार्ड, बांधकाम परवाना, वापर परवाना, कर आकारणी यासह इतर सर्व माहिती या सर्वेक्षण अंतर्गत संकलित करण्यात येत आहे. घरोघरी जाऊन या सर्वेक्षणातील पथके माहिती संकलित करत आहेत. सोलापूर शहर, हद्दवाढ व गवसु विभाग या अंतर्गत सर्व्हेक्षण करण्यात येत आहे.

एकूण ११३ पथके सर्व्हेक्षण करत आहेत. हे पथक घरोघरी जाऊन सर्व माहिती संकलित करणार आहेत. त्यानंतर सर्व डाटा एकत्रित करण्यात येईल. ही माहिती गुगल फॉर्म मध्ये भरण्यात येणार आहे. साधारणता : एक पथक रोज सुमारे ५० घरांचा सर्व्हे करणार आहेत. एकूण ११३ पथके हे काम पाहणार आहेत. साधारणतः तीन महिन्यात हे सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### काही दिवस ऑनलाइन टॅक्स भरणा बंद

ऑनलाइन मिळकत कर भरण्याची सुविधा सध्या बंद आहे. ती काही दिवसातच सुरू करण्यात येणार आहे. तूर्तास मिळकतदारांनी आपला कर प्रत्यक्षात कार्यालयात भरावा, असे आवाहन महापालिका मिळकतकर विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांनी केले आहे.

### मिळकतदारांनी पथकास सहकार्य करावे

सर्वेक्षण पथकाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व माहिती मिळकतदारांनी द्यावयाची आहे. ही माहिती देतानाच टॅक्स पावती, बांधकाम परवाना, वापर परवाना आदी महत्त्वाची कागदपत्रे ही या पथकास दाखविणे गरजेचे आहेत. जर कागदपत्रे दाखवले नाहीत तर संबंधित बाब अनधिकृत असल्याचे स्पष्ट होणार आहे. यासाठी सर्वांनी महापालिकेच्या पथकास सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शितल तेली – उगले यांनी केले आहे.

# विदर्भातील तरूणांची करमाळ्याला; घेतली समाज जीवनाची माहिती



✔ सुराज्य/करमाळा

अभिसरण युथ एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत विदर्भातील तरुणांनी करमाळा तालुक्यात विविध ठिकाणी भेटी देऊन तेथील समाज जीवनाची माहिती घेतली.

आधुनिक पद्धतीने होत असलेली शेती, विविध उपक्रमाच्या माध्यमातून बदलेल्या स्मार्ट जिल्हा परिषदेच्या शाळा, शेती पूरक व्यवसायाच्या माध्यमातून साधलेली प्रगती येथिल प्राचीन मंदीरे यांची माहिती घेतली असून १९ मे रोजी पुणे येथील असलेल्या कार्यक्रमात वैशिष्ट्य पुर्ण बाबींचे सादरीकरण केले जाणार आहे.

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई यांच्यावतीने माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या संकल्पनेतून व खासदार सुप्रिया सुळे यांच्या सुचनेनुसार यशवंतराव चव्हाण सेंटर यांच्या वतीने आयोजित केलेल्या अभिसरण मोहीमेअंतर्गत पश्चिम महाराष्ट्रातील लोकांचे आचार, विचार, भाषा, आवडी-निवडी, सवयी संस्कृतीची व विविध ठिकाणी सुरू असलेल्या वेगवेगळ्या प्रयोगांची माहिती विदर्भातील तरूणांना व्हावी विविध महीतीचे आदानप्रदान व्हावे यासाठी गडचिरोली, भंडारा, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर, अमरावती, वाशिम जिल्ह्यातील नऊ तरूणांच्या अभ्यासगटाने करमाळा तालुक्यातील शेटफळ येथील तरुणांनी एकत्र येऊन सुरू केलेल्या शेतकऱ्यांसाठी लागवडी पूर्व मशागती पासून मार्केटिंग पर्यंतचे सर्व काम करणाऱ्या लोकविकास शेतकरी उत्पादक कंपनीच्या कार्याची माहिती घेतली.

शेवटी करमाळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी या गटातील तरुणांची भेट घेऊन त्यांना विविध विषयावर मार्गदर्शन केले यावेळी कोंढारचिंचोलीचे सरपंच भोसले, लोकविकास शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष वैभव पोळ, गजेंद्र पोळ, सुहास गलांडे, प्रशांत नाईकनवरे, विजय लबडे, महावीर निंबाळकर, भाऊसाहेब निंबाळकर, सनी पोळ, सागर पोळ यांच्यासह परिसरातील तरुण उपस्थित होते.



# छत्रपती संभाजी महाराज हे बहुजनांचे राजे होते : भालशंकर

✔ **सोलापूर** : छत्रपती संभाजी महाराज शूर वीर होते, ते प्रचंड ज्ञानी होते. त्यांनी वयाच्या १४ व्या वर्षी बुद्धभूषण हा ग्रंथ लिहिला. सर्व जातीधर्माचे लोक त्यांच्या मंत्रिमंडळात होते. सर्व जाती धर्मासाठी त्यांनी कार्य केले असल्याने ते बहुजनांचे राजे होते असे महत्वपूर्ण विचार समता सैनिक दलाचे जी ओ सी समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांनी मांडले. ते समता सैनिक दलाच्यावतीने संभाजी महाराज यांच्या ३६६ व्या जयंतीनिमित्त आयोजित मानवंदना देतेवेळी बोलत होते. छत्रपती संभाजी महाराज चौकात आयोजित कार्यक्रमात जी ओ सी अण्णासाहेब भालशंकर, निवृत्त पोलीस उपनिरीक्षक केरु जाधव यांच्या हस्ते संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी समता सैनिक दलाचे रत्नदीप कांबळे, अनिल जगझाप, बापू गायकवाड, यशपाल आखाडे,बोधीप्रकाश गायकवाड, दिलीप गायकवाड, प्रा अभिजित भंडारे, पत्रकार विजयकुमार लोंढे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# अघोषित झोपडपट्ट्यांमध्ये रमाई आवास योजनेचा लाभ द्यावा

## बहुजन विकास आघाडीची मागणी

✔ **सोलापूर** : शहरातील खाजगी व अघोषित झोपडपट्ट्यांमध्ये रमाई आवास योजनेचा लाभ द्यावा तसेच या योजनेचे अनुदान वाढवून प्रत्येकी ६ लाख रुपये करावे, अशी मागणी बहुजन विकास आघाडीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली. रमाई आवास घरकुल योजनेची अंमलबजावणी करत असताना महानगरपालिकेकडून संरक्षणपात्र घोषित झोपडीधारकांनाच या योजनेचा लाभ मिळतो. परंतू सोलापूर शहरी भागामधील सद्यस्थिती पाहता घोषित खाजगी व अघोषित झोपडपट्ट्यांमधील राहत असलेल्या अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातल्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ महानगरपालिकेकडून दिला जात नाही.

याबाबत महानगरपालिकेकडे वारंवार विचारणा केली असता खाजगी झोपडपट्ट्या व अघोषित झोपडपट्ट्या असल्याचे कळविले जाते. संरक्षित झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त झालेले असल्यास अशा लाभार्थ्यांसाठी संदर्भीय दिनांक ९ मार्च २०१० शासन निर्णयामध्ये ७/१२ उतारा सादर करण्याची अट शिथील केली आहे. त्याअनुषंगाने सोलापूर शहरी भागामधील अंदाजे १४८ झोपडपट्ट्या घोषित खाजगी जागेवर वसल्याने त्या झोपडपट्टी धारकांना संरक्षित झोपडीदार म्हणून घोषित करण्यात यावे व या शासननिर्णयानुसार तेथील पिढ्यानपिढ्या राहत असलेल्या अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेचा लाभ तातडीने द्यावा, असे निवेदनात म्हटले आहे.

# धामणगावात निनादला नादब्रह्म



✔ सुराज्य/बार्शी

विठुरायाची धाकटी पंढरी म्हणून धामणगाव चा उल्लेख केला जातो. श्री. संत सद्गुरू माणकोजी महाराज बोधले महाराजाच्या जन्मोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र धामणगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन ह.भ.प. कुंडलिक महाराज पाटील धामणगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. टाळ मृदंगाचा गजर ज्ञानोबा माऊली तुकाराम अशा जय घोषामध्ये हा सप्ताह मोठ्या भक्तीवर वातावरणात साजरा होत आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात ११ मे पासून मोठ्या उत्साहा मध्ये झालेली आहे. ह भ प अर्जुन महाराज लाड, ह भ प वैराग्यमूर्ती गुरुवर्य ज्ञानेश्वर महाराज कदम व ह भ प ज्ञानेश्वर माऊली महाराज मुडेकर यांची सुश्राव्य कीर्तने झालेली आहेत. आज दिनांक १४ मे रोजी प्रभाकर महाराज बोधले (माणकोजी बोधले यांचे वंशज) यांचे तर १५ मे रोजी अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे अध्यक्ष सुधाकर महाराज इंगळे यांची कीर्तन सेवा होणार असून १६ मे रोजी ह भ प महादेव महाराज राऊत (म्हसाळा जवळा, बीड) यांची तर १७ मे रोजी हभप केशव महाराज उखळीकर (आळंदी, पुणे) यासारख्या प्रसिद्ध कीर्तनकाराचे समाज प्रबोधनात्मक कीर्तने होणार आहेत. याशिवाय प्रसिद्ध प्रवचनकाराची प्रवचनेही आयोजित करण्यात आली आहेत, ह.भ.प. रामायणचार्या राजन महाराज काशीद (पिंपरीकर), योगेश महाराज इंगळे (देवदारफळ), राणू महाराज वासकर (वासकर फड, प्रमुख पंढरपूर), हभप विवेकानंद बोधले महाराज, हभ ज्ञानेश्वर माऊली महाराज ढोराळकर, हभप अभय टिळक महाराज, नंदकुमार महाराज रणसूर (वैराग) यांच्या सुश्राव्य प्रवचनाचेही आयोजन करण्यात आले आहे.

काकड आरती, संजीवनी समाधी जलाभिषेक, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ व रात्री कीर्तन अशी कार्यक्रमाची भरगच्च रेलचेल आहे. १८ मे रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेमध्ये नगरप्रदक्षिणा साडेनऊ पर्यंत अल्पोहार व सकाळी दहा ते बारा या वेळेमध्ये ह भ प कुंडलिक तात्या पाटील धामणगावकर यांचे काल्याचे किर्तन होणार असून धामणगाव ग्रामस्थांच्या वतीने दिवसभर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.



# चारचाकी वाहनांची समोरासमोर धडक; मुलगी व वडील जखमी

✔ सुराज्य/कुर्डुवाडी

कुर्डूवाडी - शेटफळ रोडवर लऊळ (ता.माढा) हद्दीत दोन चारचाकी वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने. पिता, पुत्री जखमी झाले आहेत. ही घटना शनिवार दि.१३ मे रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास लऊळ (ता. माढा) शिवारातील विहार ढाब्या जवळ घडली. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात शार्दुल विकास शहा (रा करंकब) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

या अपघातात विकास शहा व चेताली शहा दोघे रा.करंकब ता.पंढरपुर हे जखमी झाले आहेत. याबाबत पोलिस मिळालेली माहिती अशी की, विकास शहा हे कुर्डूवाडी शहरातील नातेवाईकांना भेटण्यासाठी इको कार क्र. एम. एच.१३ इसी-१३४७ गाडीने येत असताना लऊळ हद्दीतील विहार ढाब्याजवळ समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या पिकअप क्र. एम. एच. ०९ एफझेड- ८८४३ वाहनचालकांने हयगयीने वाहन चालवून धडक दिली. वाहनाची धडक इतकी भयंकर होती की, इको कारचा दरवाजा कापत जाऊन चालक विकास शहा यांच्या पायात घुसला. तर मुलगी चेताली शहा जखमी झाले आहेत. तर धडक दिलेले पिकअप वाहन पलटी झाले तरीही त्या चालकाला कसलाही मार लागला नाही. या अपघाती घटनेची फिर्याद जखमी चालकाचा मुलगा शार्दूल विकास शहा (रा. करकंब ता.पंढरपूर) यांनी फिर्याद दिली आहे. आहेत. कुर्डूवाडी पोलिस या घटनेचा पुढील तपास पो. हेड.कॉन्सटेबल पी.एन.कांबळे हे करीत आहेत. यावेळी पत्रकार संतोष वाघमारे सोलापूरला जात असताना काही मिनिटे अगोदर हा भिषण अपघात झालेला होता. त्यांनी कुर्डूवाडी पोलिस स्टेशनला अपघाताची खबर दिली.



# बढती व वेतनाकरिता गुरू सेवा शिक्षक परिवाराचे बेमुदत चक्री उपोषण

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक संघटनेचा गुरु सेवा परिवाराच्या वतीने जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांचे मुख्याध्यापक विस्ताराधिकारी व केंद्रप्रमुख यांच्या पदोन्नत्या कराव्यात व पगार दरमहा एक तारखेला खात्यावर जमा करावा याकरिता चक्री उपोषण सुरू करण्यात आले.

जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत मे अखेर सहा शिक्षण विस्तार अधिकारी १९९ पैकी १७८ केंद्रप्रमुख व १५० मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत ही पदे पदोन्नतीने भरविण्याविषयी यापूर्वी अनेक वेळा निवेदन देऊन उपोषण करण्याचा इशाराही दिला होता.

या अनुषंगाने शिक्षण अधिकारी प्राथमिक यांनी दि ४ एप्रिल पासूनचे नियोजित चक्री उपोषण मागे घेणे विषयी पत्र देऊन दि २०एप्रिल पर्यंत मुख्याध्यापक विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांच्या पदोन्नत्या पूर्ण करणार असल्याचे सांगितले होते.

मागील दीड दोन वर्षांपासून दरमहा दहा ते पंधरा किंवा पंचवीस तारखे नंतर शिक्षकांचा पगार होतो. यामुळे शिक्षकांनी बँकांकडून घेतलेल्या कर्जाच्या रकमा वेळेवर भरता येत नसल्यामुळे त्यांना व्याज व दंड भरावे लागत आहे . याशिवाय त्यांचे क्रेडिट स्कोर खराब होत असल्यामुळे त्यांना नवीन कर्ज मिळण्यात अडचणी येत आहेत.

म्हणून याकडे प्रशासनाने तातडीने लक्ष. घालायला हवे. म्हणून गुरु सेवा परिवाराच्या वतीने जिल्हा परिषदेच्या प्रांगणात उपोषण करण्यात येत आहे . या गुरु परिवाराचे सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे शिवाजीराव पाटील गट सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ वगैरे अनेक संघ यात सहभागी झाले आहेत.

# विखेंचा दौरा रद्द झाल्याने सर्व बैठका स्थगित

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हाचे पालकमंत्री तथा राज्याचे महसुल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील सोमवारी सोलापूर दौऱ्यावर येणार होते. सकाळी १०.४० वाजता सोलापूर विमानतळावर त्यांचे आगमन होणार होते. दुपारी १२ वाजल्यापासून नियोजन भवन येथे सोलापूर जिल्हाच्या विकास आराखडा, खरीप आढावा बैठक, उज़नी पाण्याची नियोजन आढावा बैठक, आषाढी पालखी सोहळ्याचे नियोजन आणि वाळू डेपो आणि गौणखनिज विभागाची बैठक घेऊन आढवा घेणार होते मात्र त्यांचा सोलापूर दौरा अचानक रद्द झाल्याने सर्व बैठका रद्द झाल्या पुढील आठवड्यात त्यांचा दौरा होणार असल्याचे सांगण्यात आले.

# अपघातातील जखमींच्या मदतीसाठी धावले तरूण

✔ सुराज्य/सांगोला

सांगोला शहरामध्ये बाह्यवळण रिंग रोड महामार्गावर वरील नवीन जयनिला हॉटेलजवळ रविवारी रात्री इर्टीगा गाडीचा अपघात झाला होता, अपघातानंतर अपघातग्रस्त लोक मदतीसाठी विनवणी करत होते. परंतू अपघात गंभीर असल्याकारणाने मदतीसाठी कुणीही समोर येत नव्हते, तेंव्हा माजी नगरसेवकासह इतरांनी मदतीसाठी धावून कर्तव्य बजावले.

प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी रुग्णवाहिकेस मदतीसाठी फोन केला होता, परंतु तात्काळ रुग्णवाहिका अजून तिथे आली नव्हती. यावेळी मात्र सांगोला येथील माजी नगरसेवक आनंदा माने, माजी उपनगराध्यक्ष प्रशांत धनवजीर, अरुण पाटील, काशीलिंग गावडे, सोमनाथ पारसे हे कोल्हापूरवरून सांगोला येथे येत असताना, त्यांना सदर अपघात दिसताच त्यांनी कोणत्याही मदतीची वाट न पाहता अपघातातील लोकांना गाडीतून बाहेर काढून त्यांना स्वतःच्या गाडीने सांगोला येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल केले. तेवढ्यात त्यांच्या सोबत असणारी दुसरी गाडी सुद्धा तिथे सदर ठिकाणी पोहचली होती. या अपघातामध्ये जखमी झालेले कुटुंब हे इंदापूर येथील रहिवासी असून अक्षय ढवळे, सुवर्णा ढवळे, शुभम केवरे, राजेंद्र ढवळे यांच्यासह आणखी दोघेजण असे एकूण सहाजण जखमी होते. जखमीस पुढील उपचारासाठी सोलापूरला पाठवण्यात आले आहे.

## ● निधनवृत्त...

### विजयकुमार दोशी



✔ **वेळापूर** : वेळापूर (ता.माळशिरस) येथील किराणा व भुसार मालाचे व्यापारी विजयकुमार मगनलाल दोशी यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, मुलगा व दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. ते येथील कुंथूनाथ ट्रस्टचे विश्वस्त अमोल दोशी यांचे वडील होत.

### कमल काळे



✔ **अकलूज** : अकलूज येथील गोंधळी समाजाच्याकमल बबन काळे यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ६५ व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, नातवंडे व परतवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार शंकर काळे यांच्या त्या आई होत्या.


### लीलावती खाडे



✔ **सांगोला** : सांगोला येथील लीलावती चांगदेव खाडे वय ७९ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती एक मुलगा दोन मुली असा मोठा परिवार आहे दलित मित्र चांगदेव महादेव खाडे यांच्या त्या पत्नी होत.

# पंढरपूर मर्चंट बँकेवर नागेश भोसले प्रणित आघाडीचा झेंडा

✔ सुराज्य/पंढरपूर



पंढरपूर मर्चंट बँकेच्या निवडणुकीतील चुरस मतमोजणीमध्ये देखील पहावयास मिळाली. वारंवार घेण्यात आलेले आक्षेप, दोनवेळा करण्यात आलेल्या फेरमतमोजणी व समान मत अशा घडामोडी नंतर विद्यमान अध्यक्ष नागेश भोसले यांच्या आघाडीने बाजी मारत एकूण पंधरा पैकी बारा जागांवर विजय मिळवला. विरोधी आघाडीचे प्रमुख भारत भिंगे व त्यांच्या दोन उमेदवारांनी विजय मिळवून बँकेत प्रवेश केला आहे.

पंढरपूरातील व्यापाऱ्यांनी सुरू केलेल्या मर्चंट बँकेला येथील व्यापारी, पेठकरीमध्ये मोठे महत्व आहे. यंदा या बँकेवर वर्चस्व मिळविण्यासाठी सत्ताधारी गटातच फुट पडून सात संचालकांनी बँकेचे उपाध्यक्ष भारत भिंगे यांच्या नेतृत्वाखाली मर्चंट बँक विकास आघाडी स्थापन केली होती. तर विद्यमान अध्यक्ष नागेश भोसले यांच्या नेतृत्वाखाली मर्चंट बँक सहकार विकास आघाडी पुन्हा सत्तेसाठी सक्रीय होती. यासाठी मागील काही दिवसापासून जोरदार प्रचार सुरू होता. शेवटच्या टप्प्यात ही निवडणूक व्यापारी विरूध्द राजकीय नेते अशी रंगली होती. व्यापाऱ्यांची बँक व्यापाऱ्यांच्या ताब्यात राहिली पाहिजे, हा राजकीय अड्डा नाही असा प्रचार सुरू होता. परंतु सोमवारी झालेल्या मतमोजणी नंतर सभासदांनी नागेश भोसले यांच्या आघाडीकडे बँकेचा कारभार सोपविला. या बँकेचे १० हजार ३३० सभासद असून पंढरपूरसह कुर्डूवाडी, टेंभुर्णी, महूद व करकंब येथे शाखा आहेत. निवडणुकीसाठी ४ हजार ४५२ जणांनी मतदान केले होते.

एकूण पंधरा जागां पैकी भोसले यांच्या आघाडीचे एक उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. तर उर्वरीत १४ जागां पैकी ११ जागांवर भोसले यांच्या तर भिंगे यांच्या आघाडीतील तीन जणांनी विजय मिळवला. येथील शासकीय गोदाममध्ये सकाळी आठ वाजल्यापासून रात्री सात वाजे पर्यंत मतमोजणी सुरू होती. सहायक निबंधक पी.सी. दुरगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली अकरा टेबलवर मतमोजणी व फेरमतमोजणी झाली. मतमोजणीची प्रक्रिया संपल्यावर निकाल जाहीर करतानाच भिंगे यांच्या आघाडीतील उमेदवार ॲड.राजेश भादुले यांनी लेखी आक्षेप घेतला. उमेदवारांच्या प्रतिनिधींनी घेतलेली आकडेवारी व अधिकाऱ्यांनी दिलेली आकडेवारी यामध्ये ताळमेळ बसत नसल्याचा आरोप होता. यावरून त्यांनी पुन्हा सर्व मतमोजणी घेण्याची मागणी केली. यानंतर इतर मागास वर्गातील उमेदवार संजय जवंजाळ व राजेश धोकटे यांच्यातील निकाला वरून देखील शंका निर्माण झाली होती. धोकटे यांनी देखील फेरमतमोजणी करण्याची मागणी केली. यामध्ये त्यांचा पराभव झाला. तर महिला गटातून सुनंदा गांधी या एक मताने निवडून आल्या होत्या. यामुळे भोसले गटाने फेरमतमोजणीची मागणी केली. यामध्ये गांधी यांचाच विजय झाला.

### विजयी उमेदवार :

नागेश भोसले, सोमनाथ डोंबे, भगीरथ मम्हाने, राजेंद्र फड़े, राजकुमार परदेशी, अमरजीत पाटील, पांडुरंग शिंदे, शितल तांबोली, भारत भिंगे, विजयकुमार कोठारी, आदित्य फत्तेपूरकर, मंजुश्री भोसले, सुनंदा गांधी, बिनविरोध झालेली उमेदवार वसंत शिखरे

# अक्कलकोट बाजार समितीच्या सभापतीपदी सिद्रामप्पा पाटील

## उपसभापती पदी कृषीतज्ज्ञ अप्पासाहेब पाटील

सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती पदी भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील तर उपसभापती पदी कृषीतज्ज्ञ अप्पासाहेब पाटील यांची निवड करण्यात आली आहे. निवड जाहीर होताच कार्येकर्त्यांनी एकच जल्लोष करीत गुलालाची उधळण करीत फटक्यांची आतषबाजी केली.**





दरम्यान सभापती पदाकरिता सिद्रामप्पा पाटील यांचा एकमेव अर्ज आला होता. तर उपसभापती पदाकरिता सत्ताधारी गटाचे अप्पासाहेब पाटील व बसवराज माशाळे तर विरोधी गटाचे कार्तिक पाटील या तिघांचे अर्ज आले. यामध्ये सत्ताधारी गटाचे बसवराज माशाळे हे व्यापारी मतदारसंघातून असल्याने या गटाला उपसभापती पदाकरिता निवडणूक लढविता येत नसल्याने सदरचा अर्ज अवैध ठरले. कार्तिक पाटील व अप्पासाहेब पाटील यांच्यामध्ये मतदान होवून यामध्ये अप्पासाहेब पाटील यांना १२ तर कार्तिक पाटील यांना ६ मते मिळाली. यामध्ये अप्पासाहेब पाटील यांचा विजय झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी ए.जी. झालटे यांनी जाहीर केले. यावेळी सहा.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सुनील माने, सिध्देश्वर कुंभार यांनी काम पाहिले.

नूतन पदाधिकाऱ्यांचा आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी माजी आ. सिद्रामप्पा पाटील व उपसभापती अप्पासाहेब पाटील यांचा शाल, श्रीफळ, हार, गुच्छ देऊन सत्कार केले. याप्रसंगी स्वामी समर्थ सह.साखर कारखाना, अक्कलकोट व दुधनी बाजार समितीच्या नूतन संचालक सत्कार करण्यात आला. सदरच्या निवडी होताच श्री बसवेश्वर मार्केट यार्डाच्या प्रशासन भवनातून मिरवणुकीने गोदाम येथे सभेत रुपांतर होवून त्या ठिकाणी सत्कार झाला.

याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, अक्कलकोट व दुधनी बाजार समिती निवडणूकीची चर्चा संपूर्ण जिल्ह्यात झाली. या निवडणुकीच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी दिलेले उत्तर आहे.

याप्रसंगी साखर कारखान्याचे नूतन अध्यक्ष संजीवकुमार पाटील यांनी झालेल्या निवडणुकीबाबतची माहिती देवून आगामी काळात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासोबत राहून काम करणार असल्याचे सांगून तीनही संस्था प्रगतीपथावर नेवू अशी ग्वाही दिली. यावेळी महेश हिंडोळे व सोपान निकते यांनी कारखाना निवडणूकीबरोबर दोन्ही बाजार समिती निवडणुकीची माहिती राबविलेले उपक्रम याबाबत उत्कृष्ठ विवेचन केले. या कार्यक्रमात आडत व्यापारी असोसिएशनचे नूतन अध्यक्ष बसवराज घिवारे, उपाध्यक्ष संतोष भंडारे, सचिव मुसा बागवान यांचा तसेच साखर कारखाना, दोनही बाजार समितीच्या नूतन संचालकांचा देखील सत्कार यावेळी करण्यात आला. याप्रसंगी अक्कलकोट बाजार समितीचे नूतन संचालक करपे बाबूराव सिध्दप्पा, बाके कामगोंडा संगनबसप्पा, बिराजदार धनराज चंद्रकांत, बिराजदार शिवमंगल धोंडप्पा, स्वामी पार्वतीबाई इरय्या, कुंभार प्रकाश भिमराव, बंदीछोडे राजेंद्र धुळप्पा, घिवारे श्रीशैल स्वामीराव, माशाळे बसवराज शंकर व दुधनी बाजार समितीचे नूतन सभापती अप्पू परमशेट्टी, उपसभापती सिध्दाराम बाके, संचालक मोतीराम राठोड, विश्वनाथ इटेनवरू, सुवर्णा मचाले, अस्विनी सालेगाव, बहिदपाशा शेख, निंगणा पुजारी, सिध्दाराम तोळणूरे, देवेंद्र बिराजदार आदींजण उपस्थित होते.

यावेळी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष विश्वनाथ भरमशेटटी,चपळगावचे सरपंच उमेश पाटील, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अप्पू परमशेट्टी, उपसभापती सिध्दाराम बाके, चपळगाव चे महेश पाटील, मल्लिकार्जुन कारले, रमेश कौटगी, भालचंद्र मोरे, उपस्थित होते.प्रास्ताविक व सूत्रसंचलन आणि आभार मल्लिनाथ दुलंगे यांनी मानले.

**कार्याचे फलित :** सिद्रामप्पा पाटील यांनी साखर कारखाना, बाजार समिती यावर अनेकांना कार्य करण्याची संधी दिली. अनेकांना विविध संस्थेवर पदे मिळवून दिली. चपळगाव भागात साखर कारखान्याचे उपाध्यक्ष पद याबरोबर बाजार समितीचे पद देखील दिलेले असून शेतकऱ्यांकरिता जोमाने कार्य करण्याची संधी सिद्रामप्पा पाटील यांनी दिली आहे. हे माझ्या कार्याचे फलित आहे, शेतकऱ्यांचे आशिर्वाद आहे.



**- अप्पासाहेब पाटील, नूतन उपसभापती अक्कलकोट**

**सभापतीपद दुसऱ्यांदा :** याअगोदार सहकारतपस्वी सिद्रामप्पा पाटील हे दि. २७ जानेवारी १९८२ ते दि.२६ जानेवारी १९८७ या सालात अक्कलकोट बाजार समितीचे सभापती पद पाच वर्षे त्यांच्याकडेच होते. तब्बल ३६ वर्षांनी पुनश्च सभापती पदाची संधी मिळाली आहे.१९८७ चा काही काळ वगळता बाजार समितीवर सिद्रामप्पा पाटील यांची सत्ता होती व आजही ती कायम आहे.

**८५ वर्षाचे अप्पा आणि जिद्द :** आजही सिद्रामप्पा पाटील हे वयाची तमा न बाळगता तालुक्याच्या हितार्थ शेतकऱ्यांसाठी सतत धडपड सुरु असून जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ५० वर्षे संचालक, ३५ वर्षे जि.प.सदस्य, पंचायत समितीचे सभापती, जि.प.विषय समितीचे सभापती, आमदार, स्वामी समर्थ कारखाना गेल्या २५ वर्षापासून अबाधित वर्चस्व, तालुका खरेदी-विक्री संघ, सहकारी संस्थेवर वर्चस्व कायम.

**पाटील घराण्याला तिसऱ्यांदा संधी :** अक्कलकोट बाजार समितीवर सिद्रामप्पा पाटील यांना दुसऱ्यांदा तर त्यांचे सुपुत्र संजीवकुमार पाटील हे देखील बाजार समितीचे २०१६ ते २०२२ पर्यंत सभापती पदावर कार्यरत होते. वडिल आणि मुलगा यांचे अदलाबदल झालेले आहे. संजीवकुमार पाटील हे साखर कारखान्याचे चेअरमन पदाची धुरा हाती घेतली आहे. यापूर्वी दिलीपराव पाटील हे बाजार समितीचे संचालक म्हणून कार्यरत होते.

**अप्पासाहेब पाटील यांना दुसऱ्यांदा संधी :** यापुर्वी बाजार समिती २०१७ ते २०२२ पर्यंत उपसभापती पदावर कार्यरत होते. त्यावेळी सभापती संजीवकुमार पाटील हे होते. आता सिद्रामप्पा पाटील हे आहेत.

**बसवेश्वर मार्केट यार्डाचे उद्घाटन :** यापूर्वी बाजार समिती ही जुन्या अडत बाजारात होती. सिद्रामप्पा पाटील यांच्या १९८२ ते १९८७ या काळात बागेहळ्ळी रोडवरील ३३ एकर जागेत एकाच ठिकाणी व्यवसाय व प्रक्रिया युनिट मंजूरी मिळविणारे महाराष्ट्रातील त्याकाळात पहिली बाजार समिती ठरली होती. त्यावेळी ४ मे १९८४ त्याकाळचे पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास राज्यमंत्री मोहिते-पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले होते.



## आ.विक्रम सावंत यांच्यावतीने सायकलिस्ट शिंदे यांचा सत्कार

**सांगोला :** जतचे आमदार विक्रमदादा सावंत यांच्यावतीने सांगोल्याचे सायकल विक्रमवीर नीलकंठ शिंदे व राहुल पाटील यांचा सत्कार करण्यात आला. नीलकंठ शिंदे यांनी उत्तर व दक्षिण भारत सायकल परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल आमदार विक्रम सावंत यांच्या वतीने नुकतेच गौरवण्यात आले .यावेळी आमदार सावंत यांनी संपूर्ण भारत सायकल यात्रेची अनुभव व माहिती शिंदे कडून जाणून घेतली. यावेळी आमदार सावंत यांनी सदरचा हा प्रवास थक्क करणारा असल्याचे आवर्जून सांगितले. यापुढील काळात देखील अधिकाधिक सायकलिंग करून निरोगी राहून निसर्ग संवर्धन करण्याचे आवाहन केले.यावेळी जतचे सायकलिस्ट पत्रकार अनिल मदने, माजी उपसभापती बाबासाहेब कोडग यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



## छत्रपती संभाजी महाराजांची जयंती वाघोली येथे उत्साहात साजरी

**अकलूज :** स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती वाघोली तालुका माळशिरस येथे विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली. जयंतीच्या पूर्वसंध्येला ह भ प सागर महाराज बोराटे नातेपुते यांचे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर किर्तनाचा कार्यक्रम झाला. कीर्तनास महिलांची उपस्थिती उल्लेखनीय होती. बोराटे यांच्या कीर्तनानंतर सर्व उपस्थित शिवभक्तांना स्नेह भोजन देण्यात आले. दीड हजाराच्या आसपास ग्रामस्थांनी आस्वाद घेतला.दिनांक १४ मे रोजी छत्रपती संभाजी राजे यांचे पुतळयास अभिषेक घालून प्रतिमा पूजन करण्यात आले. सकाळी आठ ते दुपारी एक वाजेपर्यंत छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरात ५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.दि १४रोजी छत्रपती संभाजी महाराज यांचे प्रतिमेची भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकची सुरवात अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांचे प्रतिमा पुजनाने करण्यात आली.सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन समस्थ ग्रामस्थ वाघोली यांचे वतीने करण्यात आले होते.



## वंचित बहुजन आघाडीचे तडवळेत शाखा उद्घाटन

**कुर्डूवाडी :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त माढा तालुक्यातील तडवळे येथे वंचित बहुजन आघाडीच्या शाखेचे उद्घाटन करून साजरा करण्यात आला.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष राहुल चव्हाण यांनी मनोगतमध्ये ड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही पूरक राजकारणाचा उंचवता आलेख मांडला. यावेळी वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष राहुल चव्हाण, कुर्डुवाडी शहर अध्यक्ष प्रदिप सोनटक्के, पक्षाचे जिल्हा महासचिव विशाल नवगिरे, जिल्हा उपाध्यक्ष एम.बी.कांबळे, सत्यवान हांडे, दिलीप चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष राजकिरण ओहोळ, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब ओहोळ, जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र चांदणे, जिल्हा संघटक सुदर्शन बडेकर, गणेश पवार, अशपाक तवकल, मोहन लोंढे, कुर्डुवाडी युवक अध्यक्ष डॉ.जुगल खरात या मान्यवरांसह तडवळे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाकी येथे जलजीवन मिशनअंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ

सुराज्य/सांगोला

वाकी घेरडी येथील जलजीवन मिशन योजनेअंतर्गत नळ पाणीपुरवठा करणे या कामाचा शुभारंभ युवा नेते यशराजे दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

वाकी घेरडी गावातील वाड्या वर वस्त्या वरील एक ही गाव पाण्यापासून वंचित राहणार नाही. यासाठी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या श्रीमती स्वातीताई कांबळे व सरपंच अर्चनाताई बाळासाहेब शिंदे यांनी वेळोवेळी माजी आ. दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्याकडे या योजनेसाठी सतत पाठपुरावा करून १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला. तसेच आम. शहाजीबापू पाटील हे गाव भेट दौऱ्यावर असताना सदर योजनेसाठी १ कोटी रुपयांचा निधी वाढवून देण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच वाकी घेरडी येथील वाड्या वस्त्यावरील एक ही घर पाण्यापासून वंचित राहणार नाही. याची काळजी घेण्याच्या सूचना युवा नेते गणेश कांबळे यांना आबा-बापू यांनी दिल्या आहेत. यावेळी ज्येष्ठ नेते दादासाहेब देवकते, प्राचार्य बाळासाहेब शिंदे, हिंदुस्तान बँकेचे संचालक बाळासाहेब मराठे, उद्योगपती गोरखशेठ लवटे, उपसरपंच रमेश कांबळे, संजय लवटे, डॉ. पुण्यवंत निमग्रे, रफिक शेख, मनोहर पवार, महादेव मेटकरी, ग्रामसेवक वाघ, पाणीपुरवठा जे. ई. सासणे, सुरेश जगधने सर, बिरा दिवसे सर, कोंडीबा दुधाळ, ज्योतीराम लवटे, यासीन पठाण, बाळासाहेब वळकुंदे, बापुराव वाघमारे, समाधान शिंदे, गोरख लवटे, मल्हारी घेरडे, पांडुरंग खांडेकर, शिवाजी कांबळे, संजय मागाडे, सुशील जगधने, महादेव देवकते, भारत जगधने, अंकुश निमग्रे, नंदू शिंदे, शंकर देवकते, धनाजी चोपडे, सुरेश शिंदे, खबु जगधने, सतीश कांबळे, प्रकाश निमग्रे, देवना जगधने तसेच वाकी घेरडी गावचे ग्रामस्थ उपस्थित होते.



## बुधवारी मोफत तपासणी शिबीर

**मंगळवेढा :** मंगळवेढा शहरातील बोराळे नाका येथील मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये बुधवार दि.१७ मे रोजी मोफत त्वचारोग तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती मंगळवेढा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या प्रशासनाने दिली आहे. बुधवारी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत हे शिबीर संपन्न होणार आहे.प्रसिध्द डॉक्टर त्वचा, कॉस्मेटोलॉजिस्ट व लेसर तज्ञ डॉ.श्वेता होलेपाटील या तपासणी करणार आहेत.

## छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगावात रक्तदान

सुराज्य/अकलूज

स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६७ व्या जयंती निमित्त मराठा सेवा संघ , संभाजी ब्रिगेड च्या निमगाव शाखेमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.निमगाव येथील संभाजी ब्रिगेड क्या शाखेत गेली १६ वर्षांपासून शंभू जयंतीच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते.

यावर्षीही रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. काल दिवसभरात १११ तरुणांनी रक्तदान करून छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केले. आजपर्यंत केलेल्या रक्तदानामध्ये यावर्षी तरुणांचा उत्साह अधिक होता या मुळेच यावर्षी विक्रमी १११ जणांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी कारखान्याचे संचालक मा.रावसाहेब मगर व महाराष्ट्र केसरी रावसाहेब नाना मगर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी चंद्रकांत मगर, नानाभाऊ मगर, आप्पासहेब मगर, विराज मगर, दत्ता मगर, दत्तू मगर, ज्ञानेश्वर शेंडे, किसन पवार, ऋषिकेश मगर, विशाल मगर, ओंकार मगर, रामचंद्र मगर, आबा सावंत हे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य प्रतिक मगर, ओंकार मगर, शब्बीर मुलाणी, सुदर्शन मगर, आविष्कार गाडेकर, किशोर मगर, सत्यजित मगर आदींनी परिश्रम घेतले.



## सांगोला महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

सुराज्य/सांगोला

सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, विज्ञान महाविद्यालयामध्ये रविवारी १४ मे रोजी ऑनलाईन माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी मंडळाचे सचिव श्रीनिवास येलपले यांनी केले. पाहुण्यांची ओळख माजी विद्यार्थी समितीचे चेअरमन डॉ.नारायण आदलिंगे यांनी करुन दिली. याप्रसंगी, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा.संतोष राजगुरु यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपला विकास कसा करावा? हे सांगितले. यावेळी, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी प्रा.विद्या शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिकंदर मुलाणी यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयाची पार्श्वभूमी व महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश याचा थोडक्यात आढावा घेतला. कोळेकर यांनी आपले विचार व्यक्त करताना, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षेवर जास्त भर द्यावा,असे सांगितले. अध्यक्षपदावरुन बोलताना राज उद्योग समूहाचे उद्योगपती दादासाहेब अनुसे यांनी, विद्यार्थ्यांनी यशस्वी व्यवसाय कसा करावा? हे स्वतः चे उदाहरण देऊन सविस्तर सांगितले.सूत्रसंचलन प्रा. किसन पवार यांनी केले तर,कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.दिपक शिंदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ऑनलाईन व टेक्निकल विभागासाठी डॉ. जे.व्ही ठोंबरे व मोईन कादरी यांनी विशेष परिश्रम घेतले. हा मेळावा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली माजी विद्यार्थी समितीचे चेअरमन डॉ.नारायण आदलिंगे, माजी विद्यार्थी मंडळाचे सचिव श्रीनिवास येलपले, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद पवार, माजी विद्यार्थी समितीचे सदस्य प्रा.किसन पवार, डॉ.दिलीप कसबे, डॉ. जगन्नाथ ठोंबरे, प्रा.बाळासाहेब सरगर, प्रा.जावेद शेख, प्रा.दिपक शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## पिसाळलेला कुत्रा चावल्याने मंगळवेढ्यातील वृद्धाचा मृत्यू



सुराज्य/मंगळवेढा

पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतलेल्या मंगळवेढा शहरातील काझी गल्लली परिसरातील मोहम्मद हिरालाल बेदरे यांचा अखेर दोन महिन्यांनी मृत्यू झाला आहे.

मंगळवेढा शहरात गेल्या काही महिन्यापासून एक काळ्या रंगाचे मोकाट कुत्रे जखमी अवस्थेत फिरत होते. दोन महिन्यापूर्वी त्या कुत्र्याने मंगळवेढा शहरातील सुमारे १५ जणांचा चावा घेतला होता. जखमींना मंगळवेढा येथील खासगी व सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.सदरचा कुत्रा हा लोकांना चावत सुटले होते. या कुत्र्याने शहरातील शनिवार पेठ,जगदाळे गल्ली, माने गल्ली, बोराळे नाका, सराफ गल्ली येथील १२ जणांना चावा घेतला आहे. मात्र सायंकाळच्या सुमारास कांही युवकांनी एकत्र येवून त्या कुत्र्यास ठार मारल्याने लोकांनी सुटकेचा निःश्वास टाकला होता.

मोहम्मद हिरालाल बेदरे यांनाही हे कुत्रे चावल्यामुळे त्यांचेवर उपचार सुरू होते. उपचारादरम्यानच रविवार दिनांक १४ मे रोजी त्यांचे निधन झाले. दरम्यान, कोणालाही अशा प्रकारचा कुत्रा जर चावला त्यांनी त्वरित उपचार घ्यावयात असे आवाहन करण्यात आले आहे.

# पालखी मार्गावरील गावांना निधी मिळावा : आ.मोहिते-पाटील

## वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्याच्या दिल्या सूचना

सुराज्य/अकलूज

पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी माळशिरस तालुक्यातून संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज या दोन प्रमुख पालख्यांबरोबरच माळशिरस तालुक्यातुन छोट्या-मोठ्या पालख्याही जात असतात त्या मार्गावरील गावांनाही सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची तरतूद करून द्यावी व याबाबत वरीष्ठांकडे पाठपुरावा करण्याच्या सूचना आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी प्रांतअधिकाऱ्यांना दिल्या.

आ.रणजितसिंह मोहिते पाटील व आ. राम सातपुते यांचे अध्यक्षतेखाली येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या उदय सभागृहात आयुष्मान भारत कार्ड आढावा, जनजीवन मिशन आढावा व आषाढी वारी पालखी सोहळा नियोजन बैठक व पाणीपुरवठा टंचाई आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीस माजी पंचायत समिती उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील, प्रांतअधिकारी नामदेव टिळेकर, नायब तहसिलदार तुषार देशमुख, गटविकास अधिकारी विनायक गुळवे, आयुष्मान भारत कार्ड जिल्हा समन्वयक डॉ.भोपळे, माळशिरस तालुका आरोग्य अधिकारी डॉ.रामचंद्र मोहिते यांच्यासह तालुक्यातील सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक व सर्वच विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तालुक्यातील ३५ टक्के कार्ड नोंदणी झालेली आहे तरी ती नोंदणी ३० जून पर्यंत १०० टक्के पूर्ण करण्याच्या सूचना आ.रणजितसिंह मोहिते-पाटील व आ. राम सातपुते यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. पालखी सोहळ्याचा आढावा घेताना पालखी मार्गावरील गावांतील रस्ते, वीज, पाणी, स्वच्छता इ. महत्वपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करून वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्याबाबतही सांगितले.

दोन्ही पालखी महामार्गावरील जमिन अधिग्रहणाबाबत प्रांतअधिकाऱ्यांनी येत्या आठवडाभरात स्वतंत्र बैठक लावून प्रश्न मार्गी लावण्याबाबतच्या सूचना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अध्याप टँकरची सोय केली नसल्याने नाराजी व्यक्त केल्यानंतर याबाबत आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी संबंधित गावामध्ये तात्काळ टँकर सुरू करण्याबाबत पाठपुरावा करण्याचे आदेश प्रांतअधिकाऱ्यांना दिले.

# दंगल करणाऱ्यांना अद्दल घडवणार

## अकोला, शेवगावातील दंगलीनंतर देवेंद्र फडणवीसांचा सज्जड इशारा

सुराज्य/पुणे





**राज्यात दोन ठिकाणी दंगली झाल्या. या दंगली कुणीतरी जाणूनबुजून निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. ज्या ठिकाणी दंगली झाल्या. त्या ठिकाणची परिस्थिती नियंत्रणात आहे. पण जे कुणी दंगली घडवण्याचा प्रयत्न करत असतील तर त्यांना अद्दल घडवणार आहे. जे कोणी आगीत तेल ओतण्याचे काम करत असतील तर त्याला सोडणार नाही, पण राज्यात दंगली घडू देणार नाही, अशी तंबीच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.**

- - - - - - - - - - - - - - - -

पिंपरी चिंचवड येथे विविध विकास कामांच्या उद्‌घाटन कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड शहराच्या दौऱ्यावर आहेत. आमदार उमा खापरे यांच्या संपर्क कार्यालयाच्या उद्‌घाटन कार्यक्रमानंतर ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवर देखील संवाद साधला. १६ आमदारांच्या अपात्रेबद्दल फडणवीस यांनी सांगितले की, 'विधानसभा अध्यक्षाबाबत जी काही भाषा वापरली जाते, ती कुठे लोकशाहीला धरून आहेत. विधानसभा अध्यक्ष हे चांगले वकील आहेत. कायद्याचे त्यांना चांगले ज्ञान आहे. ते कुठलेही बेजबादारीचे काम करणार नाहीत, अध्यक्षांवर कुणी कितीही दबाव आणला तरी ते कुठल्याही दबावाला बळी पडणार नाही, असे फडणवीस यांनी सांगितले आहे.'

अकोला शहरातील जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीत काल रात्री दोन गटात तुफान दगडफेक झाली. सोशल मीडियावर व्हायरल मेसेजमुळे अकोल्यातील जुन्या शहरात शनिवारी रात्री पावणेबाराच्या सुमारास झालेल्या दंगलीत जमावाने जाळपोळ; तसेच दगडफेक केली. दोन्ही समुदायांचे गट रस्त्यांवर उतरले होते.

# बिल्डिंगमध्ये तंबाखूचा कारखाना

सुराज्य/नागपूर

**लकडगंज पोलीस स्टेशन हद्दीतील येनूरकर बिल्डिंगमधील पार्किंग परिसरात चक्क समांतर प्रतिबंधित सुगंधित तंबाखूचा कारखाना सुरू होता. गुन्हेशाखेला ही बाब कळाली. या कारखान्यावर छापा टाकून गुन्हेशाखेच्या युनिट तीनने कारसह १८ लाखांचा साठा जप्त केला. पोलिसांनी दोघांना अटक केली.**

**नागपुरात १८ लाखांचा साठा जप्त**

**काय प्रकरण?**

रूपेश अरुण नंदनवार (वय ३४, रा. गोळीबार चौक) व दत्तू बबनराव सराटकर (वय ३८, रा. जुनी शुक्रवारी) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. लकडगंज पोलिसांच्या स्टेशनच्या हद्दीत प्रतिबंधित सुगंधित तंबाखूचा कारखाना सुरू असल्याची माहिती गुन्हेशाखेचे उपायुक्त मुम्मका सुदर्शन यांना मिळाली. त्यांनी साहाय्यक पोलीस आयुक्त मनोज सिडाम यांना कारवाईचे निर्देश दिले. सिडाम यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट तीनचे पोलीस निरीक्षक महेश सागडे यांच्या नेतृत्वात साहाय्यक निरीक्षक पवन मोरे, उपनिरीक्षक मधुकर कोठाके व त्यांच्या सहकाऱ्यांनी छापा टाकला. दोघांना अटक केली. या कारखान्याचा सूत्रधार दुर्गेश अग्रवाल आहे.

या ठिकाणाहून पोलिसांनी कार, सुगंधित तंबाखूचा साठा, मशीन, रिकामी पाकिटे, झाकण आदींसह १८ लाखांचे साहित्य जप्त केले. दोघांना लकडगंज पोलिसांच्या स्वाधीन केले. या कारवाईमुळे स्थानिक पोलीस संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहेत.





## भर न्यायालयात सरन्यायाधीशांनी वकिलाला खडसावले



**नवी दिल्ली** : देशभरातील विविध प्रकरणांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होत असते. या सुनावणीच्या लिस्टिंग आदल्या दिवशी निघत असतात. दिवसभराचं कामकाज ठरलेलं असल्याने तातडीच्या सुनावण्या फार कमी वेळा घेतल्या जातात. अशातच जेव्हा वकिल, आजच सुनावणी घ्या, म्हणून आग्रह करतात तेव्हा सरन्यायाधीशांचाही राग अनावर होतो. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात हे पाहायलं मिळालं. वकिलाकडून सुनावणीसाठी विनंती होत असताना सरन्यायाधीश चंद्रचूड यांना संताप अनावर झाला. एका याचिकेवर सुनावणी व्हावी याकरता तातडीची लिस्टिंग व्हावी अशी मागणी वकिलाने केली. परंतु, या याचिकेवर सुट्टीकालीन न्यायाधीश सुनावणी घेतील, असं सरन्यायाधीशांनी सांगितलं. मात्र, तरीही सरन्यायाधीशांचा आदेश डावलून तातडीने सुनावणी घेण्याची मागणी वकिलाने केली.

## आर्यन खान प्रकरणात २५ कोटी उकळण्याचा प्रयत्न



**नवी दिल्ली** : कॉर्डेलिया क्रूझ जहाजावर समीर वानखेडे यांच्या पथकाने छापा टाकला, त्यानंतर आर्यन खानवर गुन्हा दाखल होण्यास वेळ का लागला? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. पण याबाबतचे कारण आता समोर आले आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) अंमली पदार्थ नियंत्रण ब्युरोचे (एनसीबी) माजी विभागीय संचालक समीर वानखेडे यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. समीर वानखेडे यांनी ऑक्टोबर २०२१ मध्ये मुंबईतील कॉर्डेलिया क्रूझ जहाजावर ड्रग्जच्या वादग्रस्त छाप्याचे नेतृत्व केले आणि अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन याला अटक केली. तपासाचा एक भाग म्हणून सीबीआयने वानखेडे यांच्या घरावर आणि दिल्ली, मुंबई, कानपूर आणि रांची या चार शहरांमध्ये इतर २८ ठिकाणी छापे टाकले.

## तीव्र उन्हामुळे त्वचेच्या आजाराच्या प्रमाणात वाढ

**पुणे** : तीव्र उन्हामुळे त्वचेच्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. उन्हामुळे नागरिकांना घामोळे, पुरळ, खाज आणि बुरशीजन्य त्वचेचे आजार होत आहेत. सरकारी रुग्णालयांमधील त्वचारोग विभागातील रुग्णांची संख्या सुमारे २० ते २५ टक्क्यांनी वाढली आहे. गेल्या आठवड्यात शहराचे तापमान काहींसे कमी होते, मात्र गेल्या दोन ते तीन दिवसांपासून ४० अंश सेल्सियसच्यावर शहराचे तापमान जात असल्याचे दिसत आहे. परिणामी उकाड्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. उकाडा आणि आर्द्रतेमुळे त्वचेचे आजार वाढल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले.

## टीएमटीवर वर्षभर 'धर्मवीर' मोफत

**ठाणे** : 'माझा शब्द म्हणजे काळ्या दगडावरची भगवी रेष...गद्दारांना क्षमा नाही...या आणि अशा एकापेक्षा एक संवादांमुळे बॉक्स ऑफिसवर गाजलेल्या धर्मवीर मुक्काम पोष्ट ठाणे' या चित्रपटाची पोस्टर ठाण्यातील टीएमटी बसेसवर गेले वर्षभर मोफत झळकत आहेत. या जाहिरातबाजीच्या माध्यमातून ठाणे परिवहनला कोणतेही उत्पन्न न मिळाल्याने प्रशासनाचे लाखोंचे नुकसान झाले आहे. दुसरीकडे चित्रपट प्रदर्शित होऊन वर्ष उलटूनही त्याचे पोस्टर बसेसवरून न हटवल्याने या जाहिरातींमुळे बसेसना ओंगळवाणे स्वरूप प्राप्त झाले आहे.

## महाविद्यालयीन विद्यार्थ्याची नैराश्यातून गळफास


**पुणे** : देशात तरुण-तरुणींच्या आत्महत्येच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. पुण्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्याने नैराश्यातून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या विद्यार्थ्याने सुसाईड नोटमध्ये आत्महत्या करण्याचे कारण सांगत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. विजय तुकाराम नांगरे (२१) हा विद्यार्थी परभणी गावचा राहणारा असून तो सध्या पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयात बी. ए. च्या द्वितीय वर्षात तो शिक्षण घेत होता आणि एमपीएससीच्या परीक्षेचाही अभ्यास करत होता. त्यामुळे तो विश्रांतवाडी येथील सामाजिक न्याय वसतीगृहात वास्तव्यास होता.


## गुरुद्वारा परिसरात महिलेवर झाडल्या गोळ्या


**नवी दिल्ली** : पंजाबमधील पटियाला येथे एक धक्कादायक घटना घडली आहे. गुरुद्वारा परिसरात दारू पीत असल्यामुळे भाविकाने आपल्या परवानाधारक बंदुकीतून महिलेवर गोळ्या झाडून तिची हत्या केली आहे. निर्मलजीत सिंग असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# बेकरीत मोठा स्फोट, दोन मुलांसह सहा जण होरपळले

सुराज्य/मुंबई







मुंबईतील खारदांडा परिसरात भीषण घटना घडली आहे. खारदांडा येथील एका बेकरीत गॅस गळती झाल्याने आग भडकली. या आगीत सहाजण होरपळले आहेत. सध्या या ६ जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. आगीमुळे बेकरीचंही मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. घटनेनंतर अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आलं. त्यानंतर त्यांनी मोठ्या शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवलं.

मुंबईतील खार उपनगरात खारदांडा येथील गोविंद पाटील मार्गावर हरिश्चंद्र बेकरी आहे. या बेकरीत गॅस गळती झाली. त्यानंतर सकाळी ९ वाजेच्या सुमारास गॅस सिलिंडरचा भयानक स्फोट झाला. यानंतर परिसरातील नागरिकांनी आगीची माहिती अग्निशमन दलाला दिली. अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग विझवण्याचा युद्धपातळीवर प्रयत्न केले.

# आमदार अपात्रतेवर योग्य निर्णय घेणार : नार्वेकर

सुराज्य/मुंबई



**लंडनच्या दौऱ्यावर असलेले विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे मुंबईत दाखल झालेले आहेत. त्यांनी आमदाराच्या अपात्रतेबाबत योग्य तोच निर्णय घेणार असल्याचे त्यांच्याकडून यावेळी सांगण्यात आले आहे. तसेच मी कोणाच्याही दबावात येऊन कोणताही निर्णय घेणार नसल्याचेही त्यांनी सांगितले आहे.**

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर सुप्रीम कोर्टाने गुरुवारी (ता. ११ मे) महत्त्वपूर्ण निर्णय दिला. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार १६ आमदारांच्या अपात्रतेबाबतचा निर्णय हा विधानसभा राहुल नार्वेकर यांना घ्यायचा आहे. त्यामुळे त्यांनी हा निर्णय कायद्याच्या चौकटीत राहून आणि लवकरात लवकर घ्यावा, अशी मागणी ठाकरे गटाकडून करण्यात येत आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे गेल्या काही दिवसांपासून लंडनच्या दौऱ्यावर होते. त्यामुळे ते मुंबईत कधी दाखल होतात, याबाबत कोणाला काहीही माहिती नव्हती. पण गुरुवारी (ता. १५ मे) मुंबईत दाखल झालेले आहेत. मुंबईत येताच त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला आहे. तर आमदाराच्या अपात्रतेबाबत योग्य तोच निर्णय घेणार असल्याचे त्यांच्याकडून यावेळी सांगण्यात आले आहे. तसेच मी कोणाच्याही दबावात येऊन कोणताही निर्णय घेणार नसल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

## बेकायदा पंप बसवणाऱ्या सोसायट्यांवर बडगा

**सुराज्य/ठाणे** : महापालिकेकडून देण्यात आलेल्या थेट नळ जोडणीला पाणी उपसा पंप बसवणाऱ्या सोसायट्यांवर मिरा-भाईंदर महापालिकेने नुकताच कारवाईचा बडगा उगारला आहे. या कारवाईत ५० हून अधिक पंप जप्त करत करण्यात आले असून पुढील टप्प्यात कारवाई अधिक तीव्र केली जाणार आहे. काही सोसायट्यांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी आल्याने, पालिका प्रशासनामार्फत ही कारवाई करण्यात आली आहे.

# कर्नाटकात मुस्लीम मुख्यमंत्री हवा

## पण तूर्त उपमुख्यमंत्री तरी कराच; सुन्नी संघटनेची मागणी

सुराज्य/कर्नाटक



**कर्नाटकात कधीच मुस्लीम मुख्यमंत्री झाला नाही. पण तूर्त किमान उपमुख्यमंत्री मुस्लीमच हवा, अशी मागणी सुन्नी उलेमा बोर्डाने केली आहे. उपमुख्यमंत्रीसह गृह, महसूल, आरोग्य व अन्य महत्त्वाची मंत्रीपदे मुस्लीम आमदारांना द्यावीत, असेही सुन्नी उलेमा बोर्डाचे म्हणणे आहे.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

वक्फ बोर्डाचे अध्यक्ष शाफी सादी यांनी सांगितले की, 'उपमुख्यमंत्री मुस्लीम हवा हे आम्ही निवडणुकीच्या आधीच सांगितले होते. मुस्लीम समाजाला ३० उमेदवार द्यावेत, अशी आमची मागणी होती. आम्हाला १५ जागा देण्यात आल्या. ९ जागांवर मुस्लीम उमेदवार निवडून आले. ७२ विधानसभा मतदारसंघात मुस्लीम मतदारांमुळे काँग्रेसचे उमेदवार निवडून आले आहेत. निवडणुकीत आम्ही काँग्रेसला मदत केली आहेत. त्याबदल्यात आता आम्हाला काहीतरी मिळायला हवे. उपमुख्यमंत्रीपदासह गृह, महसूल, आरोग्य अशी महत्त्वाची मंत्रीपदे आम्हाला मिळावीत. एकूण पाच मंत्रिपदे आम्हाला हवीत. आमची मागणी मान्य करून काँग्रेसने आमचे आभार मानावेत, असे सादी यांनी सांगितले.'

विजयी झालेल्या ९ मुस्लीम उमेदवारांपैकी कोणाला मंत्रिपद द्यावं हे काँग्रेसने ठरवावं. अनेक मुस्लीम उमेदवारांनी आपल्या मतदारसंघात हिंदू-मुस्लीम एकतेचे प्रतिक दाखवून प्रचार केला आहे.

खरं तर कर्नाटकात मुस्लीम मुख्यमंत्री व्हायला हवा. कारण कर्नाटकाच्या इतिहासात कधीही मुस्लीम मुख्यमंत्री झालेला नाही. कर्नाटकात ९० लाख मुस्लीम आहेत. अनुसुचित जातीनंतर आम्हीच सर्वाधिक अल्पसंख्याक कर्नाटकात आहोत, असा दावा सादी यांनी केला.

# रिक्षा-बसची समोरासमोर धडक

## सात महिलांचा जागीच मृत्यू

सुराज्य/हैद्राबाद

आंध्रप्रदेशमध्ये ऑटो रिक्षा आणि बस यांची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. काकीनाडा जिल्ह्यात रविवारी दुपारी ही घटना घडली. या भीषण अपघातामध्ये सात महिलांचा जागीच मृत्यू झाला तर आणखी सात महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. जखमी महिलांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या १४ महिला एकाच रिक्षातून प्रवास करत होत्या.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात रविवारी दुपारी ३.३० च्या सुमारास झाला. महामार्गावर विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका खासगी बसने तल्लारेवू बायपासजवळ ऑटोरिक्षाला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की यामध्ये सात महिलांचा जागीच मृत्यू झाला तर सात महिला गंभीर जखमी झाल्या.

# सात मुली बचावल्या; दोघींचा मृत्यू

सुराज्य/पुणे

पुण्यातील खडकवासला धरणात बुडून दोन मुलींचा मृत्यू झाल्याची करुणाजनक घटना समोर आली आहे. लग्नानिमित्त बुलढाण्याहून आलेल्या नऊ मुली कपडे धुण्यासाठी नदीकाठी गेल्या होत्या. यावेळी त्यांच्यापैकी एक मुलगी पाय घसरून पाण्यात पडली, तर तिला वाचवण्यासाठी आठ जणींनी पाण्यात उडी घेतली. मात्र दुर्दैवाने त्याही पाण्यात बुडू लागल्या. परंतु सात जणींचे प्राण वाचले असून दोघीं जणींना जलसमाधी मिळाली. नऊपैकी आठ जणींचे वय १६ वर्षांखालील होते.

टकले वस्ती गोर्हे खुर्द येथे गुरुवार दि. १५ मे २०२३ रोजी सकाळी सव्वा नऊ वाजताच्या सुमारास नऊ मुली-महिला कपडे धुण्यासाठी नदी काठी गेल्या होत्या. यावेळी त्यांच्यातील एक मुलगी पाय घसरून पाण्यात पडली. तिला वाचवण्याकरिता बाकी मुलींनी पाण्यात उडी घेतली. पाण्याचा अंदाज न आल्याने त्या पाण्यात ओढल्या गेल्या. त्यापैकी सात मुली व महिलांना प्राथमिक आरोग्य केंद्र खानापूर येथे उपचारा करीता आणण्यात आले. त्यातील एका मुलीला पुढील उपचारा करीता संदर्भित करण्यात आले. बाकी मुली व महिला यांची प्रकृती स्थिर असून त्यांना प्राथमिक उपचार करण्यात आले.



# 'मस्करी नाही, मी खरंच पंतप्रधानांची सासू'

## सुधा मूर्तींनी सांगितला किस्सा, म्हणतात मी साधी...

सुराज्य/मुंबई

**लेखिका, उद्योजिका आणि सेवाव्रती सुधा मूर्ती आपल्या साधी राहणी अन् उच्च विचारसरणीसाठी ओळखल्या जातात. म्हणूनच कदाचित त्यांना एका अनोख्या अडचणीला तोंड द्यावं लागतं. ते म्हणजे सुधा मूर्ती एका पंतप्रधानांच्या सासूबाई आहेत, यावर अनोळखी व्यक्ती पटकन विश्वास ठेवायलाच तयार नसते. युनायटेड किंग्डमचे भारतीय वंशाचे पहिले पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या सासूबाई सुधा मूर्ती यांची साधी राहणी अनेकदा लोकांना चकित करुन जाते.**

सुधा मूर्ती या इन्फोसिसचे सह-संस्थापक आणि उद्योगपती नारायण मूर्ती यांच्या पत्नी आहेत. तर त्यांची कन्या अक्षता या ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या पत्नी आहेत. एप्रिलमध्ये सुधा मूर्ती यांना नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलंय.

'द कपिल शर्मा शो'च्या ताज्या एपिसोडमध्ये सुधा मूर्ती यांनी एक किस्सा सांगितला. लंडनमधील हिथ्रो विमानतळावर त्यांचं आगमन झालं. इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी सुधा मूर्ती यांच्या फॉर्मवरील त्यांचा यूकेमधील निवासी पत्ता '१० डाउनिंग स्ट्रीट' - अर्थात ब्रिटनच्या पंतप्रधानांचे अधिकृत निवासस्थान आणि कार्यालय असल्याचं वाचून त्यांना आधी उडवून लावलं.

**सुधा मूर्तींनी काय सांगितलं?**

एकदा मी ब्रिटनला गेले होते, तेव्हा त्यांनी मला माझा राहण्याचा पत्ता विचारला. तुम्ही लंडनमध्ये कुठे राहता? इमिग्रेशन अधिकाऱ्याचा प्रश्न. त्यावेळी माझी मोठी बहीण माझ्यासोबत होती आणि मला वाटलं की मी '१० डाउनिंग स्ट्रीट' लिहावं. खरं तर माझा मुलगाही तिथेच (यूकेमध्ये) राहतो, पण मला त्याचा पूर्ण पत्ता काही केल्या आठवत नव्हता. मग मी शेवटी १० Downing Street असं लिहिलं. तर तो इमिग्रेशन ऑफिसर माझ्याकडे बघून म्हणाला, तुम्ही काय मस्करी करताय का माझी?!' असं सुधा मूर्ती सांगत होत्या.



मी त्याला म्हटलं, 'अरे नाही बाबा, मी तुला खरं सांगतेय, मी खरंच ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांची सासू आहे' त्याला आधी वाटलं मी थट्टा करतेय. तो तरी काय करणार बिचारा, मी एक ७२ वर्षांची साधी बाई.

एका पंतप्रधानांची सासू होऊ शकते यावर कोणाचाही विश्वास नाही असंही पुढे त्या गंमतीने म्हणाल्या.

## ११ वर्षीय मुलाचा धरणात बुडून मृत्यू

**सुराज्य/जळगाव** : जळगाव धानवड गावाजवळील धरणात मित्रासोबत पोहायला गेलेल्या ११ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडली आहे. करन जयराम पवार (वय-११) रा. चिंचोली ता. जि. जळगाव असे मयत बालकाचे नाव आहे.

सोमवारी सकाळी आई व वडील हे शेतात कामासाठी निघून गेले. त्यावेळी चारही भावंडे घरीच होते. दुपारी ४ वाजेच्या सुमारास करण हा गावातील मित्रांसोबत जवळ असलेल्या धानवड गावानजीकच्या धरणात पोहण्यासाठी गेला होता. त्यावेळी त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला.

# पूर्व विभाग जिल्हाध्यक्षपदासाठी सचिन कल्याणशेट्टींनाच पसंती

## • पश्चिम विभागासाठी अनेकजण चर्चेत; धैर्यशील यांचे पारडे जड

सुराज्य/सोलापूर

**आगामी लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून भाजपने जोरदार रणनीती सुरू केली आहे. नरेंद्र मोदी यांना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी भाजपसाठी प्रत्येक लोकसभा महत्त्वाची आहे. यासाठी सोलापूर जिल्ह्यात येणाऱ्या दोन लोकसभा जिंकण्यासाठी भाजपने आता दोन जिल्हाध्यक्ष नेमण्याचे ठरवले आहे. सोलापूरचे पूर्व विभाग आणि पश्चिम विभाग असे दोन विभाग पाडण्यात आले असून या दोन्हीमध्ये जिल्हाध्यक्ष कोण असावा याचा आढावा प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर यांनी नुकताच घेतला आहे.**

नुकताच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सोलापुरात आले होते, त्यावेळी त्यांनी महाबैठक घेऊन सोलापूर मध्ये दोन जिल्हाध्यक्ष होणार असल्याचे सांगितले होते. या दौऱ्यामध्ये भाजपचे प्रदेशाध्यक्ष विक्रम पावसकर हेही उपस्थित होते. या दौऱ्यादरम्यान पावसकर यांनी संपूर्ण जिल्ह्यातील अकरा तालुक्यामधील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली आणि दोन्ही भागात जिल्हाध्यक्ष कोण असावा याबाबत माहिती घेतली आहे.

सोलापूर पूर्व मधून बहुतांश जणांनी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनाच पुन्हा अध्यक्षपदी नेमावे असे पावसकर यांना सांगितले तर काहीजणांनी शशिकांत चव्हाण यांना संधी द्यावी अशी मागणी केली. सोलापूरच्या पूर्व विभागात अक्कलकोट, शहर उत्तर, दक्षिण आणि मध्य, मोहोळ, पंढरपूर-मंगळवेढा, या मतदारसंघाचा समावेश आहे.

दुसरीकडे पश्चिम भागामध्ये धैर्यशील मोहिते पाटील, गणेश चिवटे, राजकुमार पाटील, आमदार राजेंद्र राऊत यांची नावे सुचवण्यात आली आहेत. पाटील स्वतः जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छुक नाहीत मात्र पक्षाने जबाबदारी दिली तर ते स्वीकारण्यास तयार असल्याचे समजते. दुसरीकडे माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रणजीतसिंह निंबाळकर यांनी गणेश चिवटे यांच्यासाठी फिल्डिंग लावल्याची चर्चा आहे. पश्चिम भागात येणाऱ्या जिल्हाध्यक्ष पदासाठी अनेक जणांनी धैर्यशील मोहिते पाटील यांचे नाव सुचवल्याची माहिती आहे. पश्चिम भागात माळशिरस, सांगोला, माढा, करमाळा, बार्शी या मतदारसंघाचा समावेश आहे. प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर ही माहिती वरिष्ठ पातळीवर कळवणार आहेत. साधारण २० ते २५ मे दरम्यान जिल्हाध्यक्ष निवडी होणार आहेत.





### शहराध्यक्षपदाबाबत उत्सुकता

आगामी काळात महापालिका निवडणुका होणार आहेत. महापालिकेत पुन्हा भाजपाची सत्ता आणायची आहे. त्यामुळे शहराध्यक्षपदाबाबत कोणतेही बदल करण्यात येणार नसल्याची माहिती आहे. त्यामुळे शहराध्यक्षपदी विक्रम देशमुखच राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. असे असले तरी अनंत जाधव, हेमंत पिंगळे यांनी जोरदार फिल्डींग लावली आहे. त्यामुळे शहराध्यक्षपदावर कोण विराजमान होणार याची उत्सुकता लागली आहे.

### ३० मे पासून विशेष जनसंपर्क अभियान



भाजपतर्फे ३० मे ते ३० जून दरम्यान महासंपर्क अभियान राबवण्यात येत आहे. या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ९ वर्षातील कामगिरी, त्यांनी राबवलेल्या कल्याणाकारी योजनांची माहिती घराघरात पोहचवणे, बुथ प्रमुखांशी संवाद साधणे, प्रत्येक मतदारसंघातून रॅली काढले, मंत्र्यांच्या सभा घेणे, सोशल मिडीयावर सर्व योजनांची माहिती प्रसिद्ध करणे आदी प्रक्रिया राबवली जाणार आहे. याबाबत १६ आणि १७ रोजी होणाऱ्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत सविस्तर माहिती दिली जाणार आहे.

### मोदी ९@ जनसंपर्क अभियान समिती



विशेष जनसंपर्क अभियानासाठी मोदी ९@ जनसंपर्क अभियान समिती बनवण्यात आली आहे. यामध्ये आ. प्रवीण दरेकर संयोजक असून, आ. संजय कुटे, आ. श्रीकांत भारतीय सहसंयोजक आहेत. याशिवाय खा. डॉ. अनिल बोंडे यांच्याकडे विदर्भ, आ. जयकुमार रावल यांच्याकडे उत्तर महाराष्ट्र, खा. धनंजय महाडिक यांच्याकडे पश्चिम महाराष्ट्र, आ. निरंजन डावखरे यांच्याकडे कोकण आणि ठाणे तर आ. राणा जगजितसिंह पाटील यांच्याकडे मराठवाड्याची जबाबदारी दिली आहे. चित्रा वाघ यांच्याकडे प्रदेश महिला, राहुल लोणीकर यांच्याकडे युवा भाजप तर श्वेता शालिनी यांच्याकडे सोशल मिडीयाची जबाबदारी दिली आहे.



## मळोली ग्रामपंचायतीच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

वेळापूर : मळोली (ता. माळशिरस) संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मळोली ग्रामपंचायतीच्या नूतनीकरण इमारतीचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य व मळोली ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक रणजितसिंह जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मळोली सरपंच अर्चना रणजीतसिंह जाधव, उपसरपंच अॅड.महादेवनाना पवार उपस्थित होते. या वेळी माजी सरपंच गणेश पाटील,ग्रा.पं.सदस्स नानासाहेब जाधव,ग्रा.पं.सदस्य. विजय पाटील,ग्रा.प. सदस्य संतोष जाधव, दिलीप जाधव, जनता विद्यालयाचे प्राचार्य बी आर जाधव, पर्यावेक्षक तानाजी लवटे, अशोक शिंदे, अशोक गुजर व ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## आलेगाव येथे युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू

सोलापूर : कमरेला ट्युब बांधून शेततळ्यात पोहायला शिकवत असताना अचानक ट्युब सुटली आणि १५ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पृथ्वीराज तानाजी बाबर (वय १५, रा. वाघमोडे वस्ती) असे त्याचे नाव आहे. ही घटना शनिवारी सकाळी ९ च्या सुमारास सांगोला तालुक्यात आलेगाव येथे वाघमोडे वस्तीवर घडली. याबाबत दत्तात्रय पांडुरंग बाबर यांनी पोलिसात खबर दिली आहे. आलेगाव येथील चुलते दत्तात्रय व पुतण्या पृथ्वीराज दोघे मिळून शेततळ्यात पोहण्यास गेले होते. पुतण्या पृथ्वीराज यास पोहता येत नसल्याने त्यांनी त्याच्या पाठीवर ट्युब बांधली आणि तो पोहू लागला. त्यानंतर ते घरी आले. थोड्या वेळाने पुतण्या पृथ्वीराज घरी काही येईना म्हणून ते परत शेततळ्याकडे धावले असता तो शेततळ्यात पोहताना दिसला नाही. मात्र त्याच्या कमरेला बांधलेली ट्युब पाण्यात तरंगत असलेली दिसून आली. त्यांनी त्याचा शोध घेतला असता पाण्यात बुडालेल्या अवस्थेत मिळून आला.

## बांबूने मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर : भांडण सोडवण्यासाठी गेल्यानंतर तरुणास लाकडी बांबूने आवाहन केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अख्तर महामुद कुरेशी,अन्वर महामुद कुरेशी,सद्दाम कुरेशी व शाहरुख कुरेशी असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.ही घटना १३ मे रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास कुरेशी गल्ली येथे घडली. फिर्यादी अर्शद मोहम्मद हनीफ कुरेशी (वय-२८,रा.सदर बझार,लष्कर) यांच्या शेजारी राहणाऱ्या काकांचे व अख्तर कुरेशी व अन्वर कुरेशी यांच्याबरोबर भांडण चालू असताना फिर्यादी हे भांडण सोडवण्यासाठी गेले असता,त्यांना लाकडी बांबूने मारहाण करून शिवीगाळ केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहे.

## विवाहाचे अमिष; अल्पवयीन मुलगी सापडली वर्षानंतर

सुराज्य/सोलापूर

प्रेमातून विवाहाचे अमिष दाखवून दिपक गायकवाड याने सोलापुरातील एका अल्पवयीन मुलीला एप्रिल २०२२ मध्ये पळवून नेले होते. वर्षभरात त्यांनी ओडिसा, मुंबई, पुण्यात वास्तव्य केले होते. सोलापूर शहर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने त्या अल्पवयीन मुलीसह दिपकला पुण्यात पकडले.

विजापूर नाका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दिपक संजय गायकवाड याने एका अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर तिला विवाहाचे अमिष देऊन घरातून पळवून नेले होते. पोलिसांना त्यांचा शोध लागत नव्हता. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची जबाबदारी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे सोपविली. त्यानंतर २५ दिवसांतच या कक्षाचे प्रमुख वरिष्ठ पो. नि. बजरंग साळुंखे यांनी सायबर पोलिसांच्या मदतीने अल्पवयीन मुलगी व दिपकला पिंपरी चिंचवडमधील रघुनंदन मंगल कार्यालयाजवळ ताब्यात घेत विजापूर नाका पोलिसांच्या स्वाधीन केले. ही कामगिरी पोलिस नाईक अ. सत्तार पटेल, पोलिस शिपाई रमादेवी भुजबळ, शैला चिकमळ, चालक दादा गोरे यांच्या पथकाने पार पाडली. सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार प्रकाश गायकवाड व वसीम शेख यांनी त्यांना मदत केली.

## जिल्ह्यात एकाही गावात पाण्याचा टँकर सुरू नाही

▸ पाण्यासाठी चालू वर्षात ११.४६ लाख आराखड्यास मंजुरी

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यात मागच्या वर्षी पेक्षा यंदाच्या वर्षी पिण्याच्या पाण्याचा तुटवडा नसल्याचे जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात आले. मागच्या वर्षी उशिरा म्हणजे ऑक्टोबर अखेर सलग तीन दिवस पाऊस झाल्याने वर्षभराचा कोठा पूर्ण झाला होता.त्यामुळे आज पर्यंत जिल्ह्यात पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात आहे. आजपर्यंत जिल्ह्यात कुठेही टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला नाही.

सध्या ऑक्टोबर ते जून २३ अखेर पर्यंतच्या सर्व उपाययोजना प्रशासनाच्या वतीने केल्या असून त्याकरिता तब्बल



११.४६ लाख रुपयांचा आराखड्यास प्रशासनाने मान्यता दिली आहे जिल्ह्याला जवळपास ६०१.५० लक्ष आराखडा शासनाला पाठविला आहे. त्यामुळे याही वर्षी जिल्ह्याला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जाणवणार नाही. जिल्ह्यातून पिण्याच्या पाण्यासाठी कुठल्याही प्रकारचे टँकरची मागणी आली नसल्याचे सांगण्यात आले. पिण्याचा पाण्याचा पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी यंत्रणा तत्पर असल्याचे सांगण्यात आले. विशेष बाब म्हणजे जिल्हा ग्रामीण पुरवठ्याला जल सुविधांची साथ मिळाल्याने जल सोविदेच्या विहिरींचे पाणी हे थेट गावापर्यंत सोडण्यात आले आहे. त्यामुळे गावातील नागरिकांना जल सुविधेच्या पाणीपुरवठ्यातून पाणीपुरवठा केला जात आहे.

### जल सुविधाच्या विहिरीतून गावांना पाणीपुरवठा

ज्या गावात जल सुविधाच्या विहिरीचा पाणीपुरवठा आणि टाकी पूर्ण झाली असेल अशा ठिकाणी थेट नळाद्वारे पाणीपुरवठा सुरळीत चालू आहे. मात्र ज्या ठिकाणी पाण्याच्या टाक्यांचे काम सुरू आहे अशा ठिकाणी जल सुविधाच्या विहिरीतून पाणी थेट गावांना पुरवठा केला जात आहे. त्यामुळे पाण्याची टंचाई सध्या तरी जिल्ह्यात कुठेही नाही, असेही सांगण्यात आले.

## शेटफळ रोडवर चारचाकी वाहनांची समोरासमोर धडक

▸ मुलगी आणि वडील गंभीर जखमी

सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डूवाडी-शेटफळ रोडवर लऊळ (ता.माढा) हद्दीत दोन चारचाकी वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने. पिता, पुत्री जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी दुपारी १.३०





वाजताच्या सुमारास लऊळ ता. माढा शिवारातील विहार ढाब्या जवळ घडली.

कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात शार्दुल विकास शहा रा करंकब यांनी फिर्याद दाखल केली आहे. या अपघातात विकास शहा व चेताली शहा दोघे (रा. करंकब ता.पंढरपूर) हे जखमी झाले आहेत. विकास शहा हे कुर्डूवाडीतील नातेवाईकांना भेटण्यासाठी गाडीने येत असताना लऊळ हद्दीतील विहार ढाब्याजवळ समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या पिकअपच्या चालकांने शहा यांच्या कारला धडक दिली. यात ते दोघे जखमी झाले. याची फिर्याद जखमी चालकाचा मुलगा शार्दूल विकास शहा यांनी दिली. तपास पो. हे.कॉ. पी.एन.कांबळे हे करीत आहेत. यावेळी संतोष वाघमारे हे सोलापूरला जात असताना काही मिनिटे अगोदर हा भिषण अपघात झाला होता. त्यांनी कुर्डूवाडी पोलिस स्टेशनला अपघाताची खबर देऊन, रस्त्यावरील वाहनांची कोंडी दूर करण्यास मदत केली.

## अकलूज येथे कोयत्याने मारहाण

सोलापूर : मित्राला शिवीगाळ करू नको असे सांगितल्याच्या कारणावरून कोयत्याने केलेल्या मारहाणी तरुण जखमी झाला.

ही घटना शुक्रवारी दुपारच्या सुमारास अकलूज येथील संत गाडगेबाबा चौकाजवळ घडली. शुभम दीपक ओरसे (वय २२ रा.बायपास रोड अकलूज) असे जखमीचे नाव आहे. ते शुक्रवारी दुपारच्या सुमारास चौकातील दिलावर शेख यांच्या दुकानाजवळ बसले होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या वकाशा भोसले नावाचा तरुणाने शेख याला विनाकारण शिवीगाळ केली. त्याला शिवीगाळ का करतो? असे विचारले असता भोसले याने कोयता काढून त्यांच्या हातावर मारहाण केली. अशी नोंद अकलूज पोलिसात झाली आहे.

## शहरी आरोग्य अभियानांतर्गत विविध ४९ पदांसाठी ७०६ अर्ज

सुराज्य/सोलापूर

महापालिका शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरती प्रक्रिया कंत्राटी पद्धतीने करार तत्त्वावर राबविण्यात येत आहे. ९ संवर्गातील ४९ पदांसाठी एकूण ७०६ अर्ज महापालिका प्रशासनाकडे प्राप्त झाले आहेत. अर्ज छाननी नंतर लवकरच पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

भरती प्रक्रिया कंत्राटी पद्धतीने करार तत्वावर राबविण्यात येत आहे. यासाठी दिनांक २ ते १० मे २०२३ दरम्यान अर्ज मागविण्यात आले होते. वैद्यकीय अधिकारी, स्त्रीरोग व प्रसुती तज्ज्ञ, साथ रोग तज्ञ, जी एन एम, लॅब टेक्निशियन, फार्मासिस्ट, एएनएम आदी पदांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. विविध ४९ पदांसाठी एकूण ७०६ अर्ज प्राप्त झाले आहेत. या



अर्जाची छाननी सुरू आहे. वैद्यकिय अधिकारी युपीएचसी पूर्णवेळ या पदाच्या चार जागांसाठी एकूण २२ अर्ज प्राप्त झाले आहेत. वैद्यकीय अधिकारी प्रसुतीगृह पूर्ण वेळ या पदाकरिता दोन जागांसाठी ३ अर्ज आले आहेत. वैद्यकीय अधिकारी अर्धवेळ या पदासाठी एकही अर्ज आला नाही. स्त्रीरोग व प्रसुती तज्ज्ञ या अनुसूचित जातीसाठी असलेल्या एका पदासाठी एकही अर्ज दाखल झाला नाही. साथ रोग तज्ज्ञ या खुला प्रवर्गासाठी एक जागा असून त्यासाठी चार अर्ज प्राप्त झाले आहेत. जीएनएम या आर्थिक दुर्बल घटकाच्या प्रवर्गासाठी एक जागा असून त्यासाठी एकूण १८ अर्ज दाखल करण्यात आले आहेत. लॅब टेक्निशियन या पदासाठी एकूण १९ अर्ज प्राप्त झाले आहेत. फार्मासिस्ट या पदासाठी या दोन जागांसाठी ७६ अर्ज आले आहेत. तर एएनएमसाठी एकूण ३० जागा आहेत.

त्यासाठी तब्बल ५६४ अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये अनुसूचित जाती ५ जागा - २११ अर्ज, अनुसूचित जमाती - ३ जागा - ४०, भज(ड) १ जागा - २८ अर्ज, विमाप्र : १ जागा - २९, इतर मागास वर्ग : ५ जागा- ५९ अर्ज, आर्थिक दुर्बल घटक : ४ जागा - ९, खुला : ११ जागा - १८८ असे एएनएम या पदाच्या ३० जागांसाठी ५६४ अर्ज प्राप्त झाले आहेत. अशा पद्धतीने एकूण ४९ पदांसाठी ७०६ अर्ज प्रशासनाकडे प्राप्त झाले आहेत.

## सांगोला बाजार समिती सभापतीपदाच्या निवडणुकीसाठी चौघांची नावे चर्चेत

सुराज्य/सांगोला

सांगोला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदासाठी सत्ताधारी शेकापकडून माजी सभापती बाळासाहेब काटकर, संतोष देवकतेख अमोल खरात व समाधान पाटील यांच्या नावाची चर्चा दिसत आहे.

सांगोला बाजार समिती निवडणुकीत शेकाप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिंदे गट, काँग्रेस, भाजपा आनंदा माने गट अशा सांगोला तालुका शेतकरी विकास आघाडीने सर्व १६ जागा जिंकून एकतर्फी विजय मिळवला तर या निवडणुकीत स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांच्या परिवर्तन महाविकास आघाडीसह अपक्षांचा पराभव झाला. मार्केट कमिटीच्या अठरा जागा पैकी १२ जागा शेकापला तर राष्ट्रवादी, शिवसेना शिंदे गट, भाजप यांच्या गटाला सहा जागा मिळाल्या आहेत. लवकरच सभापती उपसभापती निवडी होणार आहेत. सत्ताधारी शेकाप



शेतकरी विकास आघाडीचे नेते मंडळींमध्ये अद्याप हालचाल दिसून येत नाही. मात्र सभापती पदासाठी बाळासाहेब काटकर, संतोष देवकते, समाधान पाटील, अमोल खरात यांच्या नावाची चर्चा सुरू आहे सभापती पदासाठी कोणाची निवड होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपसभापती पद आमदार शहाजी बापू पाटील व माजी आमदार दीपक साळुंखे पाटील यांच्या गटाला मिळावे अशी त्यांच्या कार्यकर्त्यांची मागणी आहे.

## दोघा भावांचे पैशावरून भांडण; वडिलांनी दिली पोलिसात फिर्याद

सुराज्य/सोलापूर

फिर्यादी मल्लव्या आगव्या यासम (वय-७०,रा. जुना विडी घरकुल) यांचा मोठा मुलगा विनायक व लहान मुलगा श्रीनिवास हे दोघे पैशाच्या कारणावरून भांडण करत होते.त्यावेळी वडील मल्लव्या यांनी समजावून भांडण सोडण्यासाठी गेले असता श्रीनिवास याने त्यांना शिवीगाळ करून मारहाण केली.





आहे. ही घटना दि.२९ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या दरम्यान जुना विडी घरकुल येथे घडली. याची फिर्याद मल्लव्या यासम यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून श्रीनिवास मल्लव्या यासम याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### घरातून पाच तोळ्याचे दागिने पळवले

घराच्या वरच्या मजल्यावरील बेडरूम मधील उघड्या दरवाजातून चोरट्याने प्रवेश करून लाकडी फर्निचरच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले १ लाख ६५ हजार रुपये किमतीचे पाच तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहे. ही घटना दि.१ ते १३ मे दरम्यान आदर्श नगर येथे घडली. याप्रकरणी विशाखा विवेक गोडसे (वय-२९,रा. आदर्श नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### चोरट्याने टपरीमधून पैशासह वस्तू पळवल्या

कंबर तलावा शेजारी हॉटेल मॅनेजमेंट कॉलेजच्या बाजूला असलेल्या पत्राच्या टपरीचा दरवाजा बेंड करून चोरट्याने प्रवेश करत रोख रक्कम, चहापती, साखर, मॅगी या वस्तू चोरून नेल्या आहे.ही घटना १२ ते १३ मे दरम्यान घडली.याप्रकरणी राजशेखर गिरमल्ला कलमाडी (वय-४५, रा.वसंत नगर,जगदीश मंगल कार्यालय जवळ) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## ■ सोलापुरात ठाकरे गट आक्रमक

# दूषित पाण्याच्या बाटलीचा पुष्पगुच्छ देऊन पाणीपुरवठा अधिकाऱ्यांचा उपरोधिक सत्कार

सुराज्य/सोलापूर

शहराला अळ्या युक्त दूषित पाणीपुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिकेत सत्यनारायण महापूजा घालूनही कार्यवाही होत नसल्याने अखेर सोमवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने महापालिका पाणीपुरवठा अधिकाऱ्याचा घाण पाण्याच्या बाटलीचा पुष्पगुच्छ देऊन उपरोधिक सत्कार केला.

आठ दिवसात कार्यवाही न झाल्यास उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. सोलापूर शहराच्या विस्कळीत आणि घाण पाण्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी दुपारी महापालिकेत ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा अधिकारी व्यंकटेश चौबे यांच्या कार्यालयात त्यांना घाण पाण्याच्या बाटलीचा पुष्पगुच्छ देऊन उपरोधित सत्कार करण्यात आला. यावेळी आंदोलकांनी आपल्या व्यथा मांडल्या. वेळोवेळी आंदोलन करूनही महापालिका प्रशासन कार्यवाही करत नाही. अधिकारी प्रभागात न जाता कार्यालयातच बसून असतात. प्रश्न कसा सुटणार असा सवाल प्रताप चव्हाण यांनी



उपस्थित केला. महापालिका प्रशासनाचा धिक्कार असो अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. आता चार दिवसात या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन पाणीपुरवठा अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी दिले. आठवड्यात हा प्रश्न सोडवला नाही तर सेना स्टाईलने आंदोलन करणार असल्याचा इशारा शहर उत्तर समन्वयक महेश धाराशिवकर यांनी दिला आहे. यावेळी संजय गवळी, बंटी बेळमकर, उज्ज्वल दीक्षित, सतीश माने, प्रकाश ननवरे, विशाल सोरेगावकर, विजय जव्हेरी आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### आंदोलकांना पाहून आरोग्य कार्यकारी अभियंता निघून गेले

सोलापूर महापालिकेतील सार्वजनिक आरोग्य कार्यकारी अभियंता विजयकुमार राठोड हे महापालिकेत आम्हाला पाहूनही निघून गेले. वास्तविक पाहता वरिष्ठ अधिकारी म्हणून थांबून त्यांनी आमची समस्या ऐकायला हवी होती. मात्र ते निघून गेले याबद्दल आंदोलकांनी संताप व्यक्त केला.